www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १२६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार, २८ सप्टेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### फुले आंबेडकरी वाङ्मयकोश' सोमवारी प्रकाशित होणार

● मुंबई, सचिन कदम :

'फुले आंबेडकरी वाङ्मयकोश' या दलित साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या कोशग्रंथाचे प्रकाशन सोमवारी मुंबईत होणार आहे. हे प्रकाशन प्रख्यात विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते होणार आहे. पान २ वर

### निवडणूक आयोगाचे राज्य सरकारच्या कारभारावर ओढले ताशेरे

● मुंबई, राकेश गायकवाड :



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या बदल्या बाबत केलेल्या सूचनांचा अहवाल न दिल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने नाराजी व्यक्त केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह निवडणुका होणाऱ्या इतर 4 राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहित एकाच जागी 3 वर्षापेक्षा जास्त काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पण आयोगाच्या पत्राकडे मुख्य सचिवांनी दुर्लक्ष केल्याने आयोगाने नाराजी व्यक्त केली. पान २ वर

# मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणुकीत ठाकरे गटाच्या युवा सेनेचा डंका

■ अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेला धक्का दिला आहे.

● ठाणे, यश सावंत :

राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी चर्चेत असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचा निकाल लागला आहे. यामध्ये आदित्य ठाकरेंच्या नेतृत्वाखालील युवासेनेने पुन्हा एकदा बाजी मारल्याचं दिसून आलं. आदित्य ठाकरेंच्या युवासेनेने दहाच्या दहा जाहा जिंकून भाजप प्रणित आखिल भारतीय विद्यार्थी परिषद म्हणजे ABVP चा धुव्वा उडवला आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणे यंदाही युवासेनेने सिनेटवरील आपलं वर्चस्व कायम ठेवल्याचं दिसून येतंय. आदित्य ठाकरेंच्या युवासेनेच्या उमेदवारांनी पाच हजारांच्या वर मतं घेतली. तर त्याचवेळी ABVP च्या उमेदवार हे हजारांच्या आतच गुंडाळल्याचं दिसून आलं.



विजयी उमेदवार :
- मयुर पांचाळ - युवासेना - 5350 मते, ओबीसी प्रवर्ग
- शितल देवरुखकर शेठ - 5498 मते- SC प्रवर्ग
- डॉ. धनराज कोहचाडे- 5247 मते - ST प्रवर्ग
- स्नेहा गवळी- महिला
- शशिकांत झोरे - NT प्रवर्ग
- प्रदीप सावंत - खुला प्रवर्ग
- मिलिंद साटम - खुला प्रवर्ग
- अल्पेश भोईर - खुला प्रवर्ग

पाच आरक्षित जागांवर उमेदवारांना मिळालेली उमेदवारांना मते

महिला प्रवर्ग :
युवासेना स्नेहा गवळी- महिला- 5914 मते
अभाविप - रेणुका ठाकूर -893

SC प्रवर्ग :
युवासेना -शीतल शेठ देवरुखकर - 5489
अभाविप -राजेंद्र सायगावकर - 1014

OBC प्रवर्ग :
युवासेना मयूर पांचाळ - 5350
अभाविप राकेश भुजबळ - 888

ST प्रवर्ग :
युवासेना धनराज कोहचडे - 5247
अभाविप -निशा सावरा - 924

NT प्रवर्ग :
युवासेना शशिकांत झोरे - 5170
अभाविप -अजिंक्य जाधव - 1066

मतपत्रिकांची छाननी झाल्यानंतर आणि मतपत्रिका वैध-अवैध ठरवल्यानंतर पसंती क्रमांक नुसार मतमोजणीला सुरुवात झाली. त्यामध्ये 7200 पैकी 6684 मतपत्रिका यावेळी वैध ठरल्या. खुल्या प्रवर्गासाठी साधारणपणे 1114 मतांचा कोटा ठरवण्यात आला. पान २ वर

# रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती अधिकार दिन साजरा !



**माहिती अधिकार अर्जावर सकारात्मक आणि गांभीर्यपणे कार्यवाही करावी-- वरिष्ठ अधिव्याख्याता राहूल बर्वे**

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

माहिती अधिकाराच्या प्राप्त झालेल्या अर्जावर सकारात्मक पाहण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर गांभीर्याने कार्यवाही करुन, आलेला अर्ज वेळेत निर्गत करा, असे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तथा जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचे वरिष्ठ अधिव्याख्याता राहूल बर्वे यांनी केले.

२८ सप्टेंबर हा दिवस राज्यपातळीवर माहिती अधिकार दिन साजरा करण्यात येतो. शनिवारी शासकीय सुट्टी असल्याने माहिती अधिकार दिन शुक्रवारी साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, उपजिल्हाधिकारी सर्वसाधारण शुभांगी साठे उपस्थित होत्या.

श्री. बर्वे यांनी यावेळी संगणकीय सादरीकरण करुन सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, अर्ज निकाली काढण्याचा अधिकारी आयुक्तांना आहे. पान २ वर

# परराज्यातून आयुर्वेद पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्य कोट्यातून प्रवेश मिळणार

● ठाणे, रोहित जैस्वार :

महाराष्ट्रातील अधिवास असलेला, परंतु परराज्यातून आयुर्वेद पदवी शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी राज्य कोट्यातून प्रवेशासाठी पात्र ठरत नव्हते. मात्र आता राज्य सरकारच्या निर्णयामुळे अशा विद्यार्थ्यांचा राज्यातील शासकीय व शासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये राज्य कोट्यातून प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परराज्यातून पदवी शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आता अखिल भारतीय कोट्याबरोबरच राज्य कोट्यातून प्रवेश मिळणार आहे.

बॅचलर ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन (BAMS) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अखिल भारतीय आणि राज्य कोट्यातून प्रवेश दिले जातात. यात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय व



शासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये ८५ टक्के, तर खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये राज्य कोट्यांतर्गत ७० टक्के जागा राखीव असतात. या दोन्ही कोट्यात राज्यातील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्राधान्य दिले जाते. तर उर्वरित १५ व ३० टक्के जागांवर परराज्यातील विद्यार्थ्यांना अखिल भारतीय कोट्यातून प्रवेश दिला जातो. पान २ वर

# जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा पडताच दुसऱ्या मजल्यावरून मारली उडी, उपचारादरम्यान झाला मृत्यू

● पुणे, अभिजित येरल्लू :

पुण्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्यात पोलिसांनी एका जुगार अड्ड्यावर छापा टाकला होता. त्या छाप्यातून वाचण्यासाठी एका व्यक्तीने इमारतीवरून उडी घेतली आहे. या घटनेत त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला आहे

पोलिसांनी बुधवारी रात्री १० च्या सुमारास पुण्यामधील नाना पेठेत एका इमारतीत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकला होता. त्या टाकलेल्या छाप्यातून



वाचण्यासाठी एकाने थेट इमारतीवरुन उडी मारल्याची घटना घडली आहे. या घटनेत संबंधित व्यक्तीचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. ब्रायन रुडॉल्फ गियर असे त्या मृत व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाना पेठेतील लाजवंती लॉजमध्ये जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पान २ वर

# बनावट कागदपत्रांसह भारतात राहिल्यामुळे बांगलादेशी पॉर्न स्टार रिया बर्डेला अटक

● कल्याण, विवेक गुंजाळ :

उल्हासनगर पोलिसांनी पॉर्न स्टार रिया बर्डेला अटक केली आहे. भारतीय पोर्न इंडस्ट्रीत रियाला आरोही बर्डे आणि बन्ना शेख या नावानेही ओळखले जाते. रिया बर्डे हिच्यावर बनावट कागदपत्रांद्वारे भारतात राहिल्याचा आरोप असून या आरोपामुळे तिला उल्हासनगर येथील हिल लाईन पोलिसांनीअटक केली आहे. या प्रकरणी आता पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे.

या प्रकरणी आयपीसी



४२०, ४६५, ४६८, ४७९, ३४ आणि १४अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिया मूळची बांगलादेशी असून तिची आई, भाऊ आणि बहीण बनावट कागदपत्रे बनवून भारतात बेकायदेशीरपणे राहत असल्याचा आरोप आहे. विशेष बाब म्हणजे बांगलादेशी असूनही रियाच्या आईने भारतीय कागदपत्रे मिळवण्यासाठी अमरावती येथील एका व्यक्तीशी लग्न केल्याचे समोर आले आहे.

पोलिसांनी या प्रकरणात रियाशिवाय तिची आई अंजली बर्डे उर्फ रुबी शेख, वडील अरविंद बर्डे, भाऊ रवींद्र उर्फ रियाज शेख आणि बहीण रितू उर्फ मोनी शेख यांनाही आरोपी केले आहे. हिललाइन पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, अटक करण्यात आलेली रिया अनेक प्रोडक्शन हाऊसशी संबंधित असून तिने अनेक पॉर्न फिल्म्समध्ये काम केले होते. याशिवाय रियाला पॉर्न इंडस्ट्रीत आरोही या नावानेही ओळखले जाते. पान २ वर

# एका ३२ वर्षीय युवतीने वाहतूक पोलिसाला केली मारहाण; महिला ताब्यात

● नाशिक, नितीन देवळेकर :

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा नाशिक दौऱ्यावर आले असतानाच मद्यधुंद अवस्थेत तीन युवक आणि एका ३२ वर्षीय युवतीने वाहतूक पोलिसाला मारहाण केल्याची धक्कादायक घटना इंदिरानगर बोगद्यात घडली. ही घटना बुधवारी (दि.२५) सकाळी ९.३० वाजता घडली. पोलिसांनी एका महिलेस ताब्यात घेतले आहे. पोलीस शिपाई नाझीम हुरा शेख (३४, रा. सरस्वतीनगर, अमृतधाम, नाशिक) असे जखमीचे नाव आहे. ऐश्वर्या पाटील (वय ३२, रा. सिरीन मेडोज, आनंदवली, गंगापूर रोड) असे ताब्यात




घेतलेल्या महिलेचे नाव आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार व नाझीम शेख यांच्या फिर्यादीनुसार, शेख बुधवारी सकाळी इंदिरानगर बोगदा परिसरात कर्तव्य बजावत होते. त्यावेळी एक युवक त्यांच्याकडे आला. त्याने कारमधील चौघे जण त्रास देत असल्याची तक्रार केली. त्यानंतर शेख यांनी त्यास मुंबईनाका पोलिसांकडे जाण्यास सांगितले. पान २ वर

# टाटा रुग्णालयात सुरु करण्यात आलेली 'प्रोटॉन उपचार पद्धती' रुग्णांसाठी ठरतेय वरदान

● नवी मुंबई, भावना जैन :

टाटा रुग्णालयात रुग्णांना अधिक चांगले व उत्तम उपचार मिळावेत यासाठी गतवर्षी सुरू करण्यात आलेली प्रोटॉन उपचार पद्धती रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. मागील १३ महिन्यांमध्ये टाटा रुग्णालयाच्या खारघर येथील ॲक्ट्रॅक येथे १४७ रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले. यापैकी ६२ टक्के रुग्ण सर्वसामान्य असून, २४ टक्के रुग्णांवर मोफत



उपचार करण्यात आले.

टाटा रुग्णालयाच्या खारघर येथील ॲक्ट्रॅक येथे गतवर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रोटॉन उपचार केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन झाल्यापासून आतापर्यंत कर्करोग झालेल्या १४७ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. यामध्ये १८ टक्के लहान मुलांचा समावेश आहे. या उपचार पद्धतीचे दुष्परिणाम फारच कमी असल्याने हाडांच्या कर्करोगासाठी याचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे. हाडाच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या ३२ टक्के रुग्णांवर प्रोटॉन पद्धतीने उपचार करण्यात आले आहेत. तसेच २९ टक्के स्तन कर्करोग, १४ टक्के डोके आणि मानेचा कर्करोग असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यात आले आहे. त्याचबरोबर प्रोस्थेट कर्करोग, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, पुरुष ग्रंथी कर्करोग आणि जठरासंदर्भातील कर्करोगांवरही उपचार करण्यात आल्याची माहिती प्रोटॉन उपचार केंद्राचे प्रमुख डॉ. सिद्धार्थ लस्कर यांनी दिली. प्रोटॉन उपचार पद्धतीचा जास्तीत जास्त फायदा रुग्णांना व्हावा आणि कमीत कमी दुष्परिणाम व्हावे यासाठी केंद्रात उपचार घेतलेल्या सर्व रुग्णांची तज्ज्ञांद्वारे बारकाईने तपासणी करण्यात येते. पान २ वर

# अक्षय चा मृतदेह सोमवारपर्यंत दफन करण्याचे उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

● मुंबई, विशाल कारंडे :

बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेंचा एन्काऊंटर करण्यात आला. अक्षय शिंदेच्या मृत्यूनंतर त्याच्या अंत्यविधीला विरोध होत असून दफन करण्यासाठी जागा मिळत नसल्याची तक्रार त्याच्या पालकांनी केली आहे. या संदर्भात शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयामध्ये महत्वाची सुनावणी पार पडली. या सुनावणीत सोमवारपर्यंत अक्षय शिंदेंच्या मृतदेहाचे दफन करा, असे आदेश न्यायालयाने



दिले आहेत. तसेच यासाठी राज्य सरकार जागा देणार असल्याचेही वकिलांकडून सांगण्यात आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याची पोलिसांच्या चकमकीत एन्काऊंटर झाला. अक्षय शिंदेच्या मृत्यूनंतर त्याच्या अंत्यविधीला बदलापूरकरांचा मोठा विरोध पाहायला मिळाला होता. तसेच बदलापूरमध्ये त्याचा मृतदेह दफन करु देणार नाही, अशी भूमिका नागरिकांनी घेतली होती. याविरोधात अक्षय शिंदेच्या आई-वडिलांना उच्च न्यायालयात धाव घेतली होती.


अक्षयच्या मृतदेहाची अवहेलना होत असून त्याचा मृतदेह दफन करण्यासाठी जागा मिळावी म्हणून मुंबई उच्च न्यायालयात अर्ज केला होता. या अर्जावर शुक्रवारी सुनावणी पार पडली. पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# रुग्णांना तारक, डॉक्टरांना पूरक

फार्मसिस्ट म्हणजे कोण? डी. फार्म, बी. फार्म किंवा फार्म डी. किंवा त्यातील पदव्युत्तर शिक्षण घेतलेली व्यक्ती. अशा व्यक्ती नोंदणीकृत फार्मसिस्ट होऊ शकतात. त्यांना स्वतःचे औषध दुकान सुरू करता येते किंवा रुग्णालय, फार्मा कंपनी, औषध नियंत्रण, क्लिनिकल ट्रायल्स अशा अनेक क्षेत्रांत संधी मिळू शकते. त्यापैकी औषध दुकानदारांविषयी जाणून घेऊया. जगात काही ठिकाणी अशा किरकोळ औषध विक्रेत्यांना 'कम्युनिटी फार्मसिस्ट' असेही संबोधले जाते. कम्युनिटी फार्मसिस्ट हा त्या व्यवसायाचा समाजाभिमुख चेहरा असतो. औषध खरेदी-विक्री, साठवण, कालबाह्य झालेला माल काढून टाकणे, रुग्णास औषधे देणे, रेकॉर्ड्स ठेवणे, अकाउंट्स, जीएसटी अशी अनेक कामे त्यांना करावी लागतात. स्वतःचे दुकान आणि त्यात एकच फार्मसिस्ट असल्यास त्यालाच बँक ऑफिस सांभाळावे लागते. तोच सीईओ, सीएफओ, सीओओ असतो. साहाय्यक स्टाफ असला, तरीही सर्व व्यवस्थापन आणि जबाबदारी त्या एकाच फार्मसिस्टवर येते. त्यामुळे सकाळपासून रात्री उशिरापर्यंत फार्मसिस्ट दुकानातच अडकून पडतो. साहजिकच सणवार, छंद, सुट्ट्या वगैरे चैन त्यांना परवडत नाही. आणखी एखादा फार्मसिस्ट नेमल्यास यापैकी काही करता येईलही, मात्र सहसा हे त्यांना परवडणारे नसते. अशा छोट्या दुकानदारांचा व्यवसाय काही वर्षांपूर्वीपर्यंत बरा चालत असे. त्यांना कामाचे समाधानही मिळत असे, पण आता परिस्थिती वेगळी आहे. फार्मसिस्टमध्ये अस्वस्थता दिसते. दुकानांची संख्या प्रचंड वाढली आहे. साहजिकच त्यांच्यातील चढाओढही वाढत आहे. त्यातच अनेक रुग्ण सवलती मिळविण्यासाठी औषधांची खरेदी ऑनलाइन करतात आणि औषध दुकानांकडे पाठ फिरवितात. (त्यात अद्याप इंटरनेट फार्मसीविषयी सुस्पष्ट कायदे करण्यात आलेले नाहीत.) मात्र आणीबाणीच्या वेळी रात्री बेरात्री कोपऱ्यावरील दुकानदाराकडेच धाव घेतात आणि तोही दुकान उघडून औषधे देतो. गेल्या काही वर्षांत अनेक जेनेरिक दुकाने सुरू झाली. कॉर्पोरेट फार्मसी चेन शॉप्सही वाढत आहेत आणि डिस्काउंट, स्वस्त ब्रँड्सचा पर्याय हा तिथेही एक आकर्षक मुद्दा आहे. लहान औषध दुकानांतही जेनेरिक पर्याय उपलब्ध असतातच की. पण औषध कायद्यानुसार 'डॉक्टरांनी जे लिहिले तेच दिले जाणे अपेक्षित असते. म्हणून नियमांना धरून चालणारे फार्मसिस्ट 'ब्रँड सबस्टिट्यूशन' करत नाहीत. आणखी एक बाब म्हणजे डिस्पेन्सिंग डॉक्टर्स. जुन्या (१९४० च्या) कायद्यातील 'शेड्युल के'च्या आधारे विविध पॅथींचे काही (सर्व डॉक्टर्स स्टॉक करत नाहीत) डॉक्टर्स औषधांच्या स्ट्रिप्सच्या स्ट्रिप्स, लोशन्स, क्रीम्स, टॉनिक्स असा सरसकट भरपूर स्टॉक ठेवतात आणि रुग्णांना तिथूनच देतात. ते रुग्णहित आणि रुग्णसुरक्षेसाठी योग्य आहे का? १९४० च्या काळाचा विचार करता 'शेड्युल के' ही तरतूद योग्यच, पण आता सर्व औषधे पॅक होऊन येतात. गल्लीबोळांत दवाखान्यांच्या बाजूलाच औषधांची दुकाने आहेत. आजच्या काळात दवाखान्यांत औषधांचा स्टॉक ठेवण्याची गरज आहे का? आणि ठेवला तरी किती, कोणती अत्यावश्यक औषधे हा कळीचा मुद्दा. याबाबत 'शेड्युल के' मध्ये सुस्पष्टता नाही. 'शेड्युल के'च्या सर्व शर्ती पाळल्या जातात का हे कितपत बारकाईने पाहिले जाते? कालबाह्य 'शेड्युल के'मध्ये दुरुस्ती नको? डिस्पेन्सिंग डॉक्टर्स इतरही काही देशांत आहेत. मलेशियातील पाहणीनुसार औषधे लिहून देणाऱ्या (स्टॉक न करणाऱ्या) डॉक्टर्सपेक्षा सातपट जास्त औषधे डिस्पेन्सिंग डॉक्टर्स देतात, झिम्बाब्वेमध्ये हेच प्रमाण दुप्पट दिसले. म्हणजेच स्वतः औषधे देताना गरजेपेक्षा अधिक अतार्किक, वापर होतो का? भारतात असे काही अभ्यास झाल्याचे ऐकिवात नाही. बहुतांश फार्मसिस्ट कामातील नीतिमत्तेला सर्वोच्च प्राधान्य देतात. रुग्णाची सुरक्षा केंद्रस्थानी असावी, अशी त्यांची मनोधारणा असते. ते पूर्णवेळ त्यांच्या दुकानात थांबतात. झोपेच्या गोळ्या, अँटिबायोटिक्स किंवा तत्सम औषधे प्रिस्क्रिप्शनशिवाय देत नाहीत. त्यांच्या परिसरातील डॉक्टर्सही त्यांचा आदर करतात. पण काही दुकानांत फार्मसिस्ट हजर नसतात. प्रिसक्रिप्शनशिवायही औषधे दिली जातात आणि त्यांच्यामुळे सारेच फार्मसिस्ट्स बदनाम होतात, हे वास्तव अन्यायकारक आहे. सुक्याबरोबर ओलेही जळतेच. कायद्याची कडक अंमलबजावणी नको का? आणखी एक चिंतेची बाब म्हणजे नावापुरती पदवी वा पदविका घेतलेले फार्मसिस्ट. त्यांनी प्रामाणिकपणे महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले नसते.



## आजची चित्रोळी

इथे कोसळती दोन धबधबे
रमतें मन त्या पाहूनी !
एक गिरीशिखराहून कोसळें
दुसरा रमणी शिरातूनी !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### टाटा रुग्णालयात सुरू करण्यात आलेली...

परदेशात प्रोटॉन उपचार पद्धतीसाठी एक ते दीड कोटी रुपये खर्च येतो. मात्र टाटा रुग्णालयामध्ये सर्वसामान्यांवर पाच लाख रुपये, खासगी रुग्णांवर १५ लाख रुपये आणि परदेशी रुग्णांवर २५ लाखांमध्ये उपचार करण्यात येतात. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांवर या पद्धतीने मोफत उपचार व्हावे यासाठी रुग्णालय प्रशासन सामाजिक उत्तरदायित्व अंतर्गत निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न करीत आहे, असे डॉ. लस्कर यांनी सांगितले.

कोल्हापूर येथील एका दीड वर्षाच्या मुलीला न्यूरो ब्लास्टोमा कर्करोग झाला होता. टाटा रुग्णालयात उपचार केल्यानंतर ती बरी झाली होती. मात्र १६ वर्षांनंतर तिला पुन्हा कर्करोग झाला. कर्करोगाची गाठी ही डोळयांजवळ असल्याने ती काढणे डॉक्टरांसाठी एक आव्हान होते. मात्र प्रोटॉन उपचार पद्धतीने कर्करोगाची गाठ सहज नष्ट करणे शक्य झाल्याची माहिती डॉ. लस्कर यांनी दिली.

### अक्षय चा मृतदेह सोमवारपर्यंत दफन करण्याचे...

या सुनावणीत उच्च न्यायालयाने सोमवारपर्यंत मृतदेह दफन करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यासाठी राज्य सरकार जागा उपलब्ध करून देणार आहे. राज्य सरकारच्या वकिलांनी याबाबत मुंबई उच्च न्यायालयात ग्वाही दिली आहे.

### फुले आंबेडकरी वाङ्मयकोश' सोमवारी...

मुंबईच्या प्रेस क्लबमध्ये संध्याकाळी ५.३० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात साहित्यिक अर्जुन डांगळे असणार आहेत. तसेच प्रसिद्ध समिक्षक डॉ. अनंत देशमुख आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव डॉ. मिनाक्षी पाटील या कोशग्रंथाबद्दल माहिती देणार आहेत.

### जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा पडताच ...

त्या माहितीच्या आधारे पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या युनिट -१च्या पथकाने या ठिकाणी छापा टाकला होता. पोलिसांनी दरवाजा वाजवला असता एकाने दरवाजा उघडला. मात्र पोलीस समोर दिसताच त्याने पुन्हा दरवाजा बंद केला आणि पळत जात आत बसलेल्यांना पोलीस आल्याची माहिती दिली. याच दरम्यान ब्रायन याने पोलिसांच्या भितीने थेट दुसऱ्या मजल्यावरून खाली उडी मारली आहे. पोलिसांना हे लक्षात येताच त्यांनी ब्रायनला ताब्यात घेतले आणि पुण्याच्या रुबी हॉल रुग्णालयात भरती केले. मात्र उपचार सुरू असताना ब्रायनचा रात्री एकच्या सुमारास मृत्यू झाला आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### बनावट कागदपत्रांसह भारतात राहिल्यामुळे...

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, तपासात रियाची आई अंजली ही बांगलादेशची रहिवासी असून ती आपल्या दोन मुली रिया आणि मुलासह भारतात अवैधरित्या राहत होते. रियाच्या आईने अमरावती येथील रहिवासी असलेल्या अरविंद बर्डे यांच्याशी विवाह केला, त्यांनी पश्चिम बंगालचे रहिवाशी असल्याचा दावा केला आणि नंतर स्वत: आणि तिच्या मुलांसाठी बनावट जन्म प्रमाणपत्र आणि इतर बनावट कागदपत्रे बनवून भारतीय नागरिकाचा पासपोर्ट मिळवला. रियाला यापूर्वी मुंबई पोलिसांनी वेश्याव्यवसायाशी संबंधित एका प्रकरणात अनैतिक वाहतूक कायद्यांतर्गत अटक केली होती. रियाचा मित्र प्रशांत मिश्रा याला ती मूळची बांगलादेशची असून बेकायदेशीररीत्या देशात राहात असल्याची माहिती मिळाल्यानंतर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली, त्यानंतर पोलिसांनी त्यांची कागदपत्रे तपासली आणि त्यानंतरच संपूर्ण प्रकरण उघडकीस आले.

### एका ३२ वर्षीय युवतीने वाहतूक पोलिसाला...

काही वेळेनंतर शेख यांच्याजवळ कार(एमएच ०२ बीजे ७५७८) आली. कारमधील तीन पुरुष व एका महिलेने त्यांना त्या युवकाबद्दल चौकशी केली. शेख यांनी युवकास पोलीस ठाण्यात जाण्यास सांगितले आहे, असे बोलले. तितक्यात अंदाजे २५ वयोगटातील एका युवकाने पाठीमागून अज्ञात वस्तूने शेख यांच्यावर चेहऱ्यावर मारहाण केली. त्यानंतर दोघांनी शेख यांना मारहाण केली. त्यावेळी संशयित महिला ऐश्वर्या पाटील हिने देखील शेख यांना धक्काबुक्की केली.

ही बाब नागरिकांना समजली असता नागरिकांनी संशयित महिलेस व त्यांच्या कारला अडवले. पोलिसांनी महिलेसह कार ताब्यात घेतली. शेख यांच्या फिर्यादीनुसार मुंबईनाका पोलीस ठाण्यात महिलेसह तिघांविरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

### रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती...

जनमाहिती अधिकाऱ्यांना तो नाही. या कायद्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले शासन निर्णय सर्वांनी पहावेत. त्यानुसार काय करायला नको यावर भर द्यायला हवा. जुनी माहिती मागण्यासंदर्भात आलेल्या अर्जावर अर्ज दाखल झालेल्या तारखेपासून २० वर्ष होतील एवढी आधीची माहिती देता येईल. त्रयस्थ पक्षातील माहिती देण्यासाठी अतिरिक्त १० दिवस मिळतात. एका वेळेला एका अर्जातून एकाच प्रकारची माहिती द्यावी. पहिल्या क्रमांकाची माहिती यामध्ये देणे आवश्यक आहे. अर्जात प्रश्नार्थक माहिती असेल तर या प्रश्नांने उत्तर देणे कलम २(च) नुसार माहिती देणे बंधनकारक नाही. २०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रथम अपिलिय अधिकाऱ्यांनाही शास्ती करण्याचे अधिकार आहेत. १८५० प्रकरणात शास्ती झालेली आहे. प्रत्येक दिवसाला २५० असे २५ हजार होईपर्यंत शास्तीची तरतूद आहे.

माहिती अधिकार कायद्याचा काही प्रवृत्ती गैरप्रकार करत असल्यामुळे या कायद्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतोय, असे सांगून श्री. बर्वे म्हणाले, कायद्यातील तरतुदी पाहून सकारात्मक दृष्टीकोनातून अर्जावर कार्यवाही करावी आणि असे अर्ज निर्गत करावेत.

निवासी उपजिल्हाधिकारी श्री. सूर्यवंशी म्हणाले, शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेले शासन निर्णय त्यामधील तरतुदी आणि सकारात्मक उद्देश ठेवून अशा अर्जांचे वेळेत निराकरण होईल, हे पहावे. कायद्यामध्ये डोकावल्यास प्रत्येक गोष्टीला उत्तर मिळेल, हीच सकारात्मक बांधिलकी प्रशासनात असावी, असेही ते म्हणाले. तहसिलदार श्री. गोसावी यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी महसूल तसेच अन्य विभागातील विविध शाखातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### परराज्यातून आयुर्वेद पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना...

अन्य राज्यातून बीएएमएस केलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर आयुर्वेदिक शिक्षणासाठी राज्याच्या कोट्यातून प्रवेश मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी गेल्या महिन्यात वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट होती. यावेळी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी वैद्यकीय शिक्षण प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांना आयुर्वेद विद्यार्थ्यांवरील हा अन्याय दूर करण्यासाठी पदव्युत्तर प्रवेश नियमात आवश्यक ते बदल करून मान्यतेसाठी लगेच सादर करण्याचे निर्देश दिले. यानुसार आता, परराज्यातून पदवी शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा राज्य कोट्यातून प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्राचा अधिवास असलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी राज्य कोट्यातून प्रवेश देण्यासंदर्भातील निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने घेतला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश नियमावलीमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे परराज्यातून पदवी शिक्षण पूर्ण करणाऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

### निवडणूक आयोगाचे राज्य सरकारच्या...

राज्याच्या मुख्य सचिवांना दिलेल्या कालावधीत या सगळ्याची माहिती का दिली नाही हे स्पष्ट करण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले. तीन वेळा स्मरणपत्र पाठवूनही राज्य सरकारकडून कुठलही उत्तर न आल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने ताशेरे ओढले.

राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांसोबत आढावा बैठकीदरम्यान लोकसभा 2024 च्या निवडणुकीत मुंबई शहरातील मतदान केंद्रांवर मतदारांना झालेल्या गैरसोयीबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाने नाराजी व्यक्त केली आहे. मतदान केंद्रांवर बेंच, पंखे, पिण्याचे पाणी, शेड अशा सर्व किमान सुविधांची खात्री करण्याचे अधिकाऱ्यांना सांगण्यात आले होते. पण तसे अनेक मतदान केंद्रावर झाले नसल्यामुळे नाराजी व्यक्त केली. मतदानाच्या दिवशी मतदारांच्या गैरसोयीच्या तक्रारीवर आयोग आता कठोरपणे कारवाई करणार आहे.

### मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणुकीत ठाकरे...

सिनेटच्या निवडणुकीत आदित्य ठाकरेंच्या युवासेनेने दहा जागांवर उमेदवार उभे केले होते. ते भाजपप्रणित आखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनेही दहा उमेदवार दिले होते. इतर आठ उमेदवार धरून या निवडणुकीत एकूण 28 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

सिनेट निवडणुकीतील मतमोजणी प्रक्रियेला स्थगिती देण्यास हायकोर्टाने नकार दिला. बोगस पोलिंग एजंट प्रकरणात विद्यापीठ प्रशासन आणि संबंधित उमेदवारला हायकोर्टाकडून नोटीस जारी करण्यात आली आहे. एका ठिकाणच्या गोंधळावरून संपूर्ण निवडणूक प्रक्रियेला स्थगिती देता येणार नाही असं हायकोर्टाने म्हटलं आहे. अभाविपकडून मुंबई उच्च न्यायालयात दाखल याचिकेवरील सुनावणी तूर्तास तहकूब करण्यात आली आहे.

नवी मुंबईत सिनेट निवडणुकीदरम्यान पकडल्या गेलेल्या बोगस पोलिंग एजंट प्रकरणी अभाविपने हायकोर्टात धाव घेतली होती. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या युवासेनेचा उमेदवार अल्पेश भोयर याला अपात्र ठरवत त्याला पडलेली मतं रद्द करण्याची याचिकेतून मागणी करण्यात आली होती.कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात सिनेट निवडणुकीच्या आधी युवासेनेचे उमेदवार अल्पेश भोईर यांच्या अधिकृत पोलिंग एजंट ऐवजी भलतीच व्यक्ती उपस्थित राहिल्याचा अभाविपचा आरोप होता. भोईर यांचा पोलिंग एजंट स्वप्नील सरवदे होता. मात्र उपविधानसभेचे ऐरोली युवासेना प्रमुख स्वप्नील मढवी तिथं हजर होते. त्यामुळे अल्पेश भोईर यांना मिळालेली मतं ग्राह्य धरली जाऊ नयेत अशी हायकोर्टाकडे मागणी करण्यात आली होती.

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा



सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम. एस. सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला.

फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले. लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही. जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# बदली प्रक्रियेत अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप कमी होऊन गैरप्रकाराला आळा बसण्याची शक्यता

नागपूर, (नितीन देवळेकर ) : नागपूर : एसटी कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये पारदर्शकतेसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने याबाबतची प्रक्रिया संगणकाद्वारे राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता बदली प्रक्रियेत अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप कमी होऊन गैरप्रकाराला आळा बसण्याची शक्यता आहे. एसटी महामंडळात पूर्वी विभागीय स्तरावरील बदल्या विभाग नियंत्रक कार्यालय, प्रादेशिक स्तरावरील बदल्या प्रादेशिक व्यवस्थापक कार्यालय, इतर बदल्या मुंबईतील केंद्रीय कार्यालय स्तरावर व्हायच्या. या प्रक्रियेत अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप होत असल्याने मर्जीतील कनिष्ठ अधिकारी-कर्मचाऱ्यांना इच्छेनुसार पदस्थापना दिली जाते, असा आरोप कामगार संघटनेकडून केला जायचा.

तर संघटनेच्याही पदाधिकाऱ्यांना चांगल्या ठिकाणी पदस्थापना मिळत होती. त्यामुळे ही बदली प्रक्रिया नेहमी वादात राहत होती. महामंडळाने हा गैरप्रकार थांबवण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे संगणकीकरणाचे काम मे. चेन-सिस (इंडिया) प्रा. लि. या संस्थेला दिले आहे. या संस्थेने प्रशासकीय, विनंती बदल्यांसाठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेबाबतची लिंक राज्यातील सर्व कार्यालयांना उपलब्ध केली आहे. सोबतच संस्था व महामंडळाने संगणकीय प्रणालीद्वारे बदल्यांबाबतची प्रक्रिया कशी राबवावी, याबाबत सूचनाही केली आहे. एसटीचे प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत गभणे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. कर्मचारी, अधिकाऱ्यांची माहिती सेवापुस्तकातील नोंदीनुसार संगणक प्रणालीमध्ये बिनचूक समाविष्ट करायची आहे. कर्मचाऱ्याच्या विनंती बदलीचा अर्ज, वैद्यकीय दाखले, पती-पत्नी यांचे शासकीय सेवेत कार्यरत असल्याबाबतची कागदपत्रे, इतर माहितीही संगणकीय प्रणालीवर असेल. सर्व पदांची जात प्रवर्ग निहाय अद्ययावत मंजुरी, कार्यरत व रिक्त स्थितीची नोंद कर्मचाऱ्यांना ॲपमध्ये करायची आहे. त्यानंतर बदलीबाबतची प्रक्रिया होईल.

एसटी महामंडळाकडून नागरिकांना चांगली सार्वजनिक प्रवासी सेवा देण्यासाठी एकूण ८६ हजारांच्या जवळपास अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. त्यात बस चालक, बस वाहकांसह तांत्रिक व इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे. एकूण कर्मचाऱ्यांपैकी सुमारे ६० टक्के कर्मचारी चाळिशी ओलांडलेले आहेत.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)



ठाणे -- ठाण्यात मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बंजारा मेळावा पार पडणार.."रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी ठाणे घोडबंदर रोड, आर मॉल जवळील एम एम के हॉल मध्ये राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य बंजारा मेळावा पार पडणार आहे. सेवा फाऊंडेशन, महाराष्ट्र आयोजित या मेळाव्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी येथे बंजारा भवनासाठी ५००० चौ.फु. एवढी जागा उपलब्ध करून दिल्या बद्दल त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात येणार आहे. तसेच आमदार प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या मतदार संघात बंजारा समाजभवनासाठी जागा देणार असल्यामुळे त्यांच्या देखील नागरी सत्कार ठेवण्यात आला आहे. सदर मेळावा सेवा फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री प्रकाश राठोड यांच्या नेतृत्वात पार पडणार असुन, ठाणे शहर व जिल्ह्यात बंजारा समाज बहुसंख्येने आहे. समाजाच्या विकासाच्या दृष्टीकोनाने हा मेळावा अतिशय महत्वाचा ठरणार आहे. कारण ठाणे शहर, लोकमान्य नगर, किसन नगर, कापुरबावडी, मानपाडा, वाघबीळ, आझादनगर, ब्रहमांड, पातलीपाडा, बाळकुम, दिवा, मुंब्रा, कळवा, मिरा भाईंदर, नवी मुंबई भिवंडी शहर व तालुका, कल्याण डोंबिवली शहर व तालुका, अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा अशा वेगवेगळया भागात गोर बंजारा समाज स्थानिक रहिवाशी म्हणून बहुसंख्येने वास्तव्यास आहे. तरी देखील मोजकेच सरकारी नोकर वर्ग वगळता उर्वरित समाज हा मोलमजुरी करून खातो. अशा समाजाची प्रगती होणे गरजेचे आहे. ठाणे जिल्यात मोठ्या प्रमाणात राहणारा बंजारा समाज फक्त मतदानासाठी मर्यादित नसून सतेत भागीदारी घेण्यासाठी सज्ज आहे. म्हणून काही प्रलंबित प्रश्न सुटणे महत्वाचे आहे.ज्या बंजारा समाजांनी महाराष्ट्राला महानायक वसंतराव नाईक आणि जलनायक सुधाकरराव नाईक यांच्या रूपाने दोन यशस्वी मुख्यमंत्री दिले. आणि उभ्या महाराष्ट्राचा विकास साधला. अशा बंजारा समाजाला आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत लोकसंख्येच्या हिशोबाने राजसतेचा वाटा मिळायला पाहिजे, बंजारा समाजाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, बंजारा नेत्यांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळायला पाहिजे. तसेच नव्याने सुरु करण्यात आलेल्या संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेचा लाभ शहरी भागातील तांड्याला झाला पाहिजे. सरकारच्या वतीने ठाणे जिल्यात शासकीय भूखंडावर बंजारा सांस्कृतिक भवन बांधण्यात यावा. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार माजी मुख्यमंत्री महानायक वसंतरावजी नाईक साहेब यांच्या नावाने असलेल्या ठाणे रोड वरती 'महानायक वसंतरावजी नाईक महामार्ग 'अशा आशयाचा मोठा फलक लावण्यात यावा. गोरबोली बंजारा भाषेला संविधानाच्या ८ व्या सूचित समाविष्ठ करण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात यावी. विश्व कल्याणकारी प्रार्थना करून संबंध मानव जातीला परोपकारी जीवन जगण्याचे संदेश देणारे, जी भविष्यवाणी केली ती तंतोतंत खरी ठरत आहे असे संत श्रेष्ठ सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त १५ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टी जाहीर करून सेवालाल महाराज यांचा सन्मान करण्यात यावा. असे बहू उद्देश घेऊन हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.सदर मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री संजय राठोड, खासदार नरेश मस्के, आमदार प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे हे देखील उपस्थितीत असणार आहे. विशेष उपस्थिती म्हणून धर्मगुरु महंत जितेंद्र महाराज, बंजारा नेते श्री किसनभाऊ राठोड, शंकरशेठ पवार, विलासभाऊ राठोड अध्यक्ष राष्ट्रीय बंजारा परिषद, महासचिव पंडितभाऊ राठोड यांच्यासह हजारो समाज बांधव उपस्थित असणार आहे. अशी माहिती संयोजक श्री अनिल राठोड यांनी दिली.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -2024 च्या पार्श्वभूमीवर निवडणूक/ नोडल अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**ठाणे (रोहित जैसवार) :-** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -2024 पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील 18 विधानसभा मतदारसंघातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, DLTs, ALTs व सर्व नोडल अधिकारी, समन्वय अधिकारी यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण दि.25 व 26 सप्टेंबर 2024 रोजी जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे पार पडले.

या प्रशिक्षणामध्ये अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, अतिरिक्त अभियान संचालक श्रीमती सुषमा सातपुते,अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य नियंत्रक अनाधिकृत बांधकाम सिडको, नवी मुंबईचे श्री.संजय जाधव, इब्राहिम चौधरी, उपजिल्हाधिकारी संभाजी अडकुने, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी नरेंद्र भामरे, अपर जिल्हाधिकारी मुख्य भूमी अधिकारी विजयसिंह देशमुख, नवी मुंबई आंतराष्ट्रीय प्रभावित क्षेत्र सुकेशिनी पगारे, अपर जिल्हाधिकारी मुख्य भूमी व भूमापन अधिकारी दीपक क्षिरसागर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे उपजिल्हाधिकारी विकास पाटील, उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, जिल्हा परिषदचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरुडकर, ठाणे महानगरपालिकाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी, नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, नवी मुंबई महानगरपालिका उपायुक्त शरद पवार, सुनिल भुताने, जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, जिल्हा पुरवठा अधिकारी विकास गजरे, अंजली कानडे, उदय किसवे, तहसिलदार स्मिता मोहिते यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण वर्गात यावेळी नामांकन, छाननी, निवडणूक चिन्ह वाटप, अपात्रता, कायदा आणि सुव्यवस्था, पोस्टल मतपत्रिका, खर्चाचे निरीक्षण, माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समिती, पेड न्यूज, मतमोजणी आणि निकाल जाहीर करणे इत्यादी बाबींशी संबंधित विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 मध्ये करावयाच्या कार्यवाहीबाबत संगणकीय सादरीकरणाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विधानसभा मतदार संघातील निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी, समन्वयक अधिकारी उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गाचे सूत्रसंचलन नायब तहसिलदार स्मितल यादव यांनी केले.

# केंद्रीय क्षयरोग प्रतिबंध लसीकरण मोहिमेच्या डॉ.तृप्ती शिंदे यांनी शहापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना दिली भेट

**ठाणे (सुचित शिंदे) :-** प्रौढ क्षयरोग प्रतिबंध लसीकरण (बीसीजी) उपक्रमांची पडताळणी करण्यासाठी केंद्रीय क्षयरोग प्रतिबंध लसीकरण मोहीमेच्या डॉ. तृप्ती शिंदे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम टीमसह क्षयरोग पथक, शहापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, डोळखांब येथील डेहळे उपकेंद्र व मालद अंगणवाडी येथील लसीकरण सत्रास दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी भेट दिली. यावेळी जिल्हा क्षयरोग




अधिकारी डॉ. अलका परगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. तरुलता धानके, तालुका स्तरावरील कर्मचारी उपस्थित होते.

केंद्र शासनाने २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त करण्याचे धोरण आखले आहे. क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरोग मुक्त करण्यासाठी ठाणे जिल्हयामध्ये १८ वर्षावरील पात्र नागरिकांना ३ सप्टेंबर २०२४ पासून क्षयरोग प्रतिबंध लसीकरण (बीसीजी) करण्यात येत आहे. यानिमित्ताने जास्तीत जास्त पात्र लाभार्थींचा सहभाग वाढविण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी केंद्रीय क्षयरोग प्रतिबंध लसीकरण मोहिमेच्या डॉ. तृप्ती शिंदे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

# सिडकोकडून अनधिकृत बांधकामावर जोरदार कारवाई



**नवी मुंबई (भावना जैन) :** एकीकडे राज्य सरकारने प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेल्या बांधकामांविषयी नियमीतीकरण्याचा शासन निर्णय जाहीर केल्यानंतर सिडको मंडळाच्या नियंत्रक व अनधिकृत बांधकामे विभागाकडून नवी मुंबई आणि पनवेलमधील बेकायदा बांधकामांवर जोरदार कारवाई सूरू झाली आहे.

सरकारच्या आदेशानंतर नवीन बांधकामांना सुद्धा सरकारच्या या नियमितीकरणाचा लाभ होण्यासाठी काही प्रकल्पग्रस्तांकडून हालचाली सूरु असताना मागील दोन दिवसात सिडकोने नवी मुंबईतील कोपरखैरणे, बेलापूर, तळवली तसेच पनवेलमधील शिलोत्तर रायचूर (सूकापूर) या परिसरात अनेक बांधकामे जमीनदोस्त केली.

पनवेल आणि नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी २५ फेब्रुवारी २०२२ रोजीपर्यंतच्या गरजेपोटी केलेल्या बांधकामांसाठी राज्य सरकारने शासन निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयानंतर महिनाभरातच म्हणजे २३ ऑक्टोबरपर्यंत सिडको मंडळाला नवी मुंबईतील ९५ गावांच्या १९७० सालच्या गावठाण सीमेपासून दाटीवाटीने असणा-या क्षेत्राचा गुगल इमेजव्दारे सिडको सर्वे करणार आहे. या सर्वेमधील बांधकामे नियमीत केली जाणार आहेत. मात्र काही प्रकल्पग्रस्तांनी बांधकामे नियमीत होणार असल्याने सध्या जोरदार बांधकामे हाती घेतली आहेत.

# कल्याणच्या राधानगरमधील दररोजच्या वाहन कोंडीने प्रवासी हैराण

**कल्याण ( आकाश कांबळे):** कल्याण पश्चिमेतील खडकपाडा भागातील राधानगर भागातील रस्त्यांवर दररोज वाहतूक कोंडी होत आहे. या सततच्या वाहन कोंडीमुळे या भागातील रहिवासी, परिसरातील शाळांमध्ये येणारी विद्यार्थी, पालक, रुग्णालयांमध्ये येणारे रुग्ण, नातेवाईक हैराण आहेत. या कोंडीवर प्रभावी उपाययोजना करून हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कल्याणच्या वाहतूक विभागाकडे केली आहे. कल्याणमधील खडकपाडा भागातील राधानगर हा नव्याने विकसित झालेला भाग आहे. या भागात तीन मोठी रुग्णालये, शाळा, नृत्यालय, बाजारपेठ आहे.

या भागात वाहनतळाची कोणतीही सुविधा नाही. त्यामुळे नागरिक रस्त्यावर वाहने उभी करून खरेदीसाठी, मुलांना शाळेत सोडण्यासाठी, रुग्णांना रुग्णालयात पाहण्यासाठी जातात. दरम्यानच्या काळात या रस्त्यावरून मोठे अवजड वाहन आले तर या रस्त्यावर कोंडी



होते. या कोंडीत रुग्णवाहिका, शाळेच्या बस, प्रवासी नागरिक अडकून पडतात.

दररोज या भागात वाहन कोंडी होत आहे. या कोंडीमुळे या भागात नव्याने राहण्यास आलेले स्थानिक रहिवासी हैराण आहेत. त्यांना आपल्या सोसायटीतून आपले वाहन बाहेर काढताना रस्त्यावरील वाहनांचा अडथळा पार करून जावे लागते. बाजारपेठेत खरेदीसाठी येणारे नागरिक बाजारातील रस्त्यावर रिकामी जागा असेल तेथे वाहने उभी करतात. या वाहने उभी करण्यावरून अनेक वेळा खरेदीदार, व्यापारी, रहिवासी यांच्या वाद होत आहेत. वाहतूक पोलिसांची या भागात गस्त नसल्याने वाहन चालक बेशिस्तीने या भागातून वाहने चालवितात. या भागात कशाही पध्दतीने वाहने उभी करतात. या सर्व तक्रारी माजी आमदार नरेंद्र पवार, भाजप सरचिटणीस साधना गायकर यांनी कल्याण वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. खडकपाडा राधानगर भागातील रस्त्यांवर सम, विषम तारखे प्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी करण्याची सुविधा वाहतूक विभागाने निर्माण करून दिली, तसेच या भागातून दररोज टोईंग वाहन फिरवले तर रस्त्यावर बेशिस्तीने वाहने उभी करण्याच्या प्रकाराला बऱ्याच प्रमाणात आळा बसेल, अशी सूचना माजी आमदार पवार यांनी वाहतूक अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# पुनर्विकासातील 'लबाडी'ला अंकुश!



**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** सिडकोने बांधलेल्या तसेच ३० वर्षाहून अधिक जुन्या झालेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचे वारे वाहत असताना कमी वयोमान असलेल्या भक्कम इमारतीदेखील धोकादायक ठरवून पुनर्विकासाच्या लाटेत हात धुऊन घेऊ पाहणाऱ्यांना महापालिका प्रशासनाने उशिरा का होईना चाप लावण्याचा निर्णय घेतला आहे. तीस वर्षांपेक्षा कमी आयुर्मान असलेल्या इमारतींचा संरचनात्मक परीक्षण अहवाल (स्ट्रक्चरल ऑडिट) हे अतिउच्च दर्जा असलेल्या शासकीय संस्थेमार्फतच करून घेण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी काढले आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून इमारत धोकादायक जाहीर करण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावांमध्ये आयआयटी मुंबई यांच्याकडील संरचनात्मक परीक्षण अहवाल बंधनकारक करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. नवी मुंबईतील वाशी, घणसोली, नेरुळ, सीवूड्स, ऐरोली यांसारख्या उपनगरांमध्ये सिडकोने उभारलेल्या इमारतींची संख्या बरीच मोठी असून यापैकी अनेक वसाहती या ३० वर्षांपेक्षा जुन्या झाल्या आहेत. या वसाहतींमधील धोकादायक ठरलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचे जोरदार वारे सध्या नवी मुंबईत वाहत आहेत. पुनर्विकासाचे हे वारे जोमाने वाहत असताना या लाटेत हात धुऊन घेण्यासाठी बांधकाम माफियांची एक मोठी टोळी शहरात सक्रिय झाल्याची चर्चा आहे. घणसोली भागात माथाडी कामगारांसाठी उभारण्यात आलेल्या एका मोठ्या वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासात अशाच पद्धतीने प्रक्रिया डावलून सुरू असलेला सावळागोंधळ मध्यंतरी लोकसत्ताने उघडकीस आणला होता.

# कल्याणच्या राधानगर परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न तातडीने सोडवा - माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या ट्रॅफिक पोलिसांना सूचना

## पी1- पी 2 पार्किंग धोरण राबविण्याची आग्रही भूमिका

**कल्याण (विवेक गुंजाळ) :** कल्याण पश्चिमेच्या खडकपाडा परिसरातील राधानगर भागात गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वाहतूक कोंडी मुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्यासह पी 1- पी2 सारखे पार्किंग धोरण राबविण्याची सूचना माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केली आहे. भारतीय जनता पक्षाच्या सरचिटणीस साधना गायकर यांच्या कार्यालयात वाहतूक पोलिसांसोबत झालेल्या बैठकीत पवार यांनी या सूचना केल्या आहेत.




कल्याण पश्चिमेतील खडकपाडा परिसर आणि यामध्ये येणाऱ्या राधा नगर हा नव्या कल्याणचा महत्त्वाचा भाग आहे. विशेष म्हणजे या एकाच परिसरात 3 मोठी रुग्णालये, शाळा, डान्स स्कूल आदींसह मोठी बाजारपेठही आहे. परिणामी इथल्या मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वाहनांचे पार्किंग वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत आहे. परिणामी स्थानिक नागरिकांना आणि इथल्या व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

यासंदर्भात स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी भाजप सरचिटणीस साधना गायकर यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने साधना गायकर यांच्या कार्यालयात वाहतूक पोलिसांच्या अधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. ज्यामध्ये या परिसरातील वाहतूक कोंडीवर लवकरात लवकर ठोस उपाय योजना करण्याची आग्रही मागणी माजी आमदार पवार यांनी यावेळी केली. तसेच वाहनांच्या पार्किंगसंदर्भात पी1-पी2 सारखे धोरण राबविण्याची सूचना करत तातडीने ही वाहतूक कोंडी फोडण्याची सूचना केली. तर नागरिकांची समस्या जाणून घेत त्यासाठी बैठक लावल्याबद्दल स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी माजी आमदार नरेंद्र पवार आणि सरचिटणीस साधना गायकर यांचे विशेष आभार मानले. या बैठकीला माजी परिवहन सदस्य तथा कल्याण पश्चिम विधानसभा संयोजक स्वप्निल काटे, भाजपा वॉर्ड अध्यक्ष सुनिल चव्हाण, प्रविण देशपांडे, राजेश लिंबाचिया, सच्चिदानंद दुबे, उमेश झुंजारराव, सुभाष वाणी, सतीश त्रिपाठी, पल्लवी खंडागळे, सुमित शाह, श्रीकांत शेळके आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यावसायिक व नागरिक उपस्थित होते.

# बदलापूर, अंबरनाथला मिळणार अतिरिक्त पाणी उल्हास नदीतून आरक्षण मंजूर, योजना मार्गी लागणार

**बदलापूर (गणेश बागडे) :** अंबरनाथ आणि बदलापूर शहरासाठी उल्हास नदीतून अतिरिक्त ७ दशलक्ष घनमीटर पाण्याचे आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे अंबरनाथमधील पाणी योजना मार्गी लागणार आहे. तर पाणी आरक्षणामुळे रखडलेली बदलापुरातील पाणी योजना मंजूर होणार आहे. दोन्ही शहरांच्या 256 पर्यंत वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेल इतका पाणीसाठा यामुळे पदरात पडला आहे. आता पाणी योजना मार्गे लागल्यास या वाढीव आरक्षण मिळालेल्या पाण्याचा वापर करता येईल. बदलापूर आणि अंबरनाथ शहराची पाणीपुरवठा व्यवस्था महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून चालवली जाते. बदलापूर शहराला उल्हास नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेज बंधाऱ्यातून पाणी पुरवले जाते. अंबरनाथ शहरालाही याच



पाण्यातून काही भाग दिला जातो. अंबरनाथ शहराची लोकसंख्या पाहता अंबरनाथ पालिकेचे चिखलोली धरण शहराला सहा दशलक्ष लिटर पाणी देते. तर २० दशलक्ष लिटर पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अंबरनाथ शहराला पुरवले जाते. बॅरेज बंधाऱ्याची क्षमता सुमारे १३० दशलक्ष लिटर इतकी आहे. त्यातील ७० दशलक्ष लिटर पाणी बदलापूर शहराला तर उर्वरित पाणी अंबरनाथ शहराला दिले जाते. मात्र दोन्ही शहरांची वाढती पाण्याची मागणी पाहता शासनाकडून २०५६ पर्यंत पुरेल इतक्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी अंबरनाथ आणि बदलापूर या दोन्ही शहरांसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली. यातील अंबरनाथ शहराच्या पाणीपुरवठा योजनेला गती मिळाली आहे. तर तांत्रिक बाबींमुळे बदलापूर शहरातील पाणी योजना रखडली होती. यामध्ये नव्याने पाणी आरक्षण ही महत्त्वाची बाब होती.

# मॉडेलिंग सोडून स्वीकारला अध्यात्माचा मार्ग, 'आशिकी' फेम राहुल रॉयबरोबरची ही तरुणी आहे विवाहित ब्रह्मचारी

विनोद खन्ना, बरखा मदानसारख्या काही बॉलीवूड सेलिब्रिटींनी ग्लॅमर सोडून अध्यात्माचा मार्ग स्वीकारला आहे. यात आणखी एक नाव जोडलं गेलं आहे. ते नाव आहे अभिनेता राहुल रॉयच्या बहिणीचे आहे. 'आशिकी' चित्रपटातून पदार्पण केल्यानंतर सुपरस्टार बनलेल्या राहुल रॉयची मानलेली बहीण पिया ग्रेस रॉय एकेकाळी मॉडेल होती आणि नंतर ती बिझनेसवुमन बनली. पण नंतर तिने या सर्व गोष्टींचा त्याग करून आध्यात्माचा मार्ग निवडला. पिया ही विवाहित असून पतीबरोबर राहते.

प्रसिद्ध मॉडेल असण्याबरोबरच पिया टॅलेंट मॅनेजमेंट फर्म देखील सांभाळत होती. सोशल मीडियावरही तिचे लाखो फॉलोअर्स आहेत. पण





नंतर तिने सर्व काही सोडून ब्रह्मचारी होण्याचा निर्णय घेतला आणि आपलं नाव देखील बदलले. पियाने आता तिचे नाव हरी माँ प्रियांका ठेवले आहे. तिचा भाऊ राहुल रॉय अनेकदा त्याला भेटायला जात. तो आपल्या बहिणीलाही आपली गुरु मानतो.

रक्षाबंधनला दोघांचा फोटो पाहायला मिळाला होता. राहुल रॉयने स्वत: त्याच्या इन्स्टाग्रामवर फोटो शेअर केला होता. 'रक्षाबंधनाच्या शुभेच्छा हरी माँ, माझी बहीण, माझी गुरु हरी माँ प्रियंका', असं कॅप्शन त्याने फोटोला दिलं होतं.

पियाचा पती कोण?

पियाचे इन्स्टाग्राम प्रोफाइल पाहिल्यास तिची मॉडेल म्हणून शेवटची पोस्ट २०२० ची आहे. पियाने रोमर सेनशी लग्न केलं आहे. ती स्वतःला विवाहित ब्रह्मचारी म्हणते. तिचा नवराही तिच्या यात पाठिंबा देतो. दोघे अनेकदा एकत्र फोटो शेअर करतात. पियाचा नवरा रोमर ट्रॅव्हल इन्फ्लुएन्सर आणि ऑटोमोबाईल व हॉटेल समीक्षक आहे. पिया एक गायिका देखील आहे आणि ती मार्शल आर्ट देखील शिकली आहे.

राहुल रॉयने 'आशिकी' चित्रपटातून पदार्पण केले होते. हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला आणि राहुल रॉय मोठा स्टार बनला. त्याने १० दिवसांत ४७ चित्रपट साईन केले होते, पण त्यापैकी त्याचे अनेक चित्रपट सुरू होण्यापूर्वीच बंद झाले आणि अनेक चित्रपट फ्लॉप झाले. राहुलने त्याच्या संपूर्ण करिअर एकच हिट चित्रपट दिला. त्यानंतर राहुल रॉय बिग बॉसमध्ये सहभागी झाला होता आणि त्याने या शोची ट्रॉफी जिंकली. त्यानंतर एकदा राहुलला अर्धांगवायूचा झटका आला, तेव्हा त्याची मानलेली बहीण पिया त्याची सेवा करण्यासाठी पुढे आली. तिने रात्रंदिवस त्याची सेवा केली होती. राहुल तिला मनापासून आपली बहीण मानतो. राहुल पियाला आपली गुरु म्हणतो.

# गौतम गंभीरच्या जागी धोनीचा खास मित्र, KKRचा मोठा निर्णय

आयपीएल २०२५ च्या हंगामापूर्वी अनेक संघांमध्ये बदल होताना पाहायला मिळत आहे. आयपीएल २०२५ सुरू होण्यासाठी बराच वेळ असला तरी संघांनी तयारी सुरू केली आहे. दरम्यान, बीसीसीआयकडून लवकरच रिटेनशन पॉलिसी जारी करण्यात येणार असल्याची बातमी आहे. परंतु संघांनी त्यांच्या सपोर्ट स्टाफला आणखी मजबूत करण्यासाठी निर्णय घेत आहेत. आता KKR आणि CSK बद्दल एक मोठी बातमी समोर आली आहे. केकेआरने गौतम गंभीरच्या जागी आपल्या नवीन मार्गदर्शकाची घोषणा केली आहे. CSK साठी हा एक धक्का असू शकतो.

आयपीएलचा सध्याचा चॅम्पियन संघ, KKR म्हणजेच कोलकाता नाइट रायडर्सने आपल्या नवीन मार्गदर्शकाची घोषणा केली आहे. केकेआरने म्हटले आहे की, वेस्ट इंडिजच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक असलेला ड्वेन ब्राव्हो आता त्यांचा नवा मार्गदर्शक असेल. यापूर्वी ड्वेन ब्राव्हो सीएसकेच्या संघाचा भाग होता, याच संघाकडूनही तो खेळला आहे.

गेल्या काही हंगामांपासून तो गोलंदाजी सल्लागाराची भूमिका बजावत होता. ड्वेन ब्राव्हो हा मुंबई आणि CSK या दोन्ही संघांसाठी खेळलेला खेळाडू आहे. सीएसकेसाठी आयपीएल जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये त्याची गणना होते. २०११ पासून तो सतत चेन्नई सुपर किंग्जसोबत दिसत होता, पण आगामी सीझनमध्ये तो केकेआरच्या जर्सीमध्ये दिसणार आहे.

# रोहित शर्माचा दुसऱ्या कसोटीत नाणेफेक जिंकत चकित करणारा निर्णय

भारत वि बांगलादेश दुसरा कसोटी सामना पावसामुळे उशिरा झाला. तर सामन्याची नाणेफेकही १ तास उशिराने झाली. भारताने बांगलादेश विरुद्ध दुसऱ्या कसोटी सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय कर्णधार रोहित शर्माने आणखी एक धक्कादायक निर्णय घेतला. कानपूर कसोटीसाठी संघाने प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल केलेला नाही. याचाच अर्थ कानपूरच्या घरच्या मैदानावर खेळण्यासाठी कुलदीप यादवला अजून काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. नाणेफेक जिंकल्यानंतर अशी एक घटना घडली आहे, जी गेल्या ९ वर्षात प्रथमच घडली आहे.

भारतीय संघाने ५ वर्षांनंतर प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल केलेला नाही. तर याव्यतिरिक्त भारतीय संघाने घरच्या भूमीवर ९ वर्षांनंतर नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. कानपूरमध्ये दुसऱ्यांदा अशी घटना घडली. भारताने घरच्या भूमीवर १४व्यांदा नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. १४ सामन्यांपैकी ४ वेळा प्रथम गोलंदाजी करताना भारताने सामना



गमावला आहे. बांगलादेशविरुद्धच्या कानपूर कसोटीपूर्वी २०१५ मध्ये हा प्रकार घडला होता. भारताचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना अनिर्णित राहिला. त्यावेळेस विराट कोहली कर्णधार होता.

कानपूरमधील २४ कसोटी सामन्यांमध्ये ही दुसरी वेळ आहे की एखाद्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी १९६४ मध्ये (इंग्लंडविरुद्ध) असे घडले होते. सलग दोन कसोटी सामन्यांमध्ये भारताने प्रथमच नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. १९९७ मध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातील तीन सामन्यांची मालिका एकमेव मालिका होती ज्यामध्ये नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेण्यात आला.

भारताने २०१९ मध्ये प्लेइंग इलेव्हनमध्ये कोणताही बदल न करता सलग दोन मायदेशी कसोटी सामने खेळले होते. बांगलादेशविरुद्ध इंदूर आणि कोलकाता कसोटीत असं घडलं होतं. यानंतर आता २०२४ कानपूर कसोटीत भारताने सलग दुसऱ्या कसोटी सामन्यात प्लेईंग इलेव्हनमध्ये बदल केलेला नाही. बांगलादेश संघाने प्लेइंग इलेव्हन मध्ये २ बदल केले आहेत. तस्किन अहमद आणि नाहिद राणा यांच्या जागी तैजुल इस्लाम आणि खालिद अहमद यांना संधी मिळाली.

भारताची प्लेइंग इलेव्हन:

यशस्वी जैस्वाल, रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, विराट कोहली, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), केएल राहुल, रवींद्र जडेजा, रविचंद्रन अश्विन, आकाश दीप, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज.

बांगलादेशची प्लेइंग इलेव्हन:

शादमान इस्लाम, झाकीर हसन, नझमुल हुसेन शांतो (कर्णधार), मोमिनुल हक, मुशफिकुर रहीम, शकीब अल हसन, लिटन दास (यष्टीरक्षक), मेहदी हसन मिराज, तैजुल इस्लाम, हसन महमूद, खालिद अहमद.

# 'नवरा माझा नवसाचा २'ने सातव्या दिवशी कमावले एक कोटी







'नवरा माझा नवसाचा २' चित्रपट पर्दर्शित होऊन एक आठवडा झाला आहे. गेल्या शुक्रवारी म्हणजेच २० सप्टेंबरला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आहे. चित्रपटाने दमदार ओपनिंग केली आणि वीकेंडला चांगली कमाई केली. नंतर मात्र कमाईत घट झाल्याचं पाहायला मिळालं. आता चित्रपटाचे एका आठवड्याचे कलेक्शन किती झाले आहे? ते जाणून घेऊयात.

'नवरा माझा नवसाचा २' हा १९ वर्षांपूर्वी आलेल्या 'नवरा माझा नवसाचा' चित्रपटाचा सीक्वेल आहे. पहिल्या भागात नवस, बसचा प्रवास आणि नवस पूर्ण होताना घडलेल्या मजेदार घटना दाखवण्यात आल्या होत्या. आता दुसऱ्या भागात नवीन नवस आहे, पण प्रवास मात्र ट्रेनचा आहे. या चित्रपटाची सोशल मीडियावरही जोरदार चर्चा आहे. आता या चित्रपटाने सात दिवसांत किती कमाई केली आहे, त्याची आकडेवारी समोर आली आहे. इंडस्ट्री ट्रॅकर सॅकनिल्कने दिलेल्या आकडेवारीनुसार, चित्रपटाने पहिल्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी १.८६ कोटी रुपयांची कमाई केली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी चित्रपटाच्या कमाईत वाढ झाली, चित्रपटाने २.४३ कोटी रुपयांचे कलेक्शन केले.

## दिनविशेष

**घटना**

२०१८: सुलावेसी भूकंप २०१८ - या ७.५ रिश्टर भूकंपामुळे निर्माण झालेल्या मोठ्या त्सुनामी दुर्घटने मध्ये किमान ४३४० लोकांचे निधन तर १० हजार पेक्षा जास्त लोक जखमी.

२००८ : फाल्कन १ स्पेसएक्स कंपनी चे पहिले खाजगी अंतराळयान प्रक्षेपित.

१९९९: आशा भोसले - यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर.

१९९४ : एमएस एस्टोनिया क्रूझ हे जहाज बाल्टिक समुद्रात बुडाले त्यात किमान ८५२ लोकांचे निधन.

१९६०: संयुक्त राष्ट्र - माली आणि सेनेगल देशांचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

१९५८ : फ्रान्स देशाने नवीन संविधान स्वीकारले.

१९५१ : पहिले रंगीत टेलिव्हिजन CBS ने पहिले रंगीत टेलिव्हिजन सर्वसामान्यांना विक्रीसाठी उपलब्ध केले,

१९५० : संयुक्त राष्ट्र - इंडोनेशिया देशाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.

**जन्म**

१९८२: अभिनव बिंद्रा - ऑलिम्पिकमध्ये वयक्तिक सुवर्णपदक मिळवणारे पहिले भारतीय पद्म भूषण, मेजर ध्यानचंद खेलरत्न

१९८२ : रणबीर कपूर चित्रपट अभिनेते

१९६६: पुरी जगन्नाध - भारतीय दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथा लेखक

१९४७: शेख हसीना - बांगलादेशच्या १०व्या पंतप्रधान

१९४६ : माजिद खान पाकिस्तानी क्रिकेट कप्तान

१९४० : नारायण भारतीय कादंबरीकार, केरळचे पहिले आदिवासी कादंबरीकार (निधन : १६ ऑगस्ट २०२२)

१९२९: लता मंगेशकर - भारतीय जगप्रसिद्ध पार्श्वगायिका भारतरत्न, पद्म विभूषण, पद्म भूषण, राष्ट्रीय चित्रपट, दादासाहेब फाळके पुरस्कार
(निधन: ६ फेब्रुवारी २०२२)

१९२५ : सेमूर क्रे - अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ (निधन: ५ ऑक्टोबर १९९६)

१९२४: सुन्द्री उत्तमचंदानी भारतीय लेखक (निधन: ८ जुलै २०१३)

**मृत्यू**

२०२२ : जयंती पटनायक राष्ट्रीय महिला आयोगाच्या पहिल्या अध्यक्षा (जन्म: ४ एप्रिल १९३२)

२०२० : गुरुराजा श्यामाचार्य अमूर - भारतीय साहित्यिक समीक्षक आणि लेखक साहित्य अकादमी पुरस्कार (जन्म: ८ मे १९२५)

२०१६ : शिमोन पेरेस - इस्रायल देशाचे ९वे राष्ट्राध्यक्ष, पोलिश - इस्रायली राजकारणी (जन्म: २ ऑगस्ट १९२३)

२०१२ : ब्रजेश मिश्रा - भारताचे पहिले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पद्म विभूषण (जन्म: २९ सप्टेंबर १९२८)

२००७ : वॅली पार्क्स नॅशनल हॉट रॉड असोसिएशनचे संस्थापक, अमेरिकन उद्योगपती (जन्म: २३ जानेवारी १९१३)

२००४ : डॉ. मुल्कराज आनंद लेखक (जन्म: १२ डिसेंबर १९०५)

१९९८ : शिवप्रसाद सिंग भारतीय हिंदी लेखक (जन्म: १९ ऑगस्ट १९२८)

१९९४ : के.ए. थांगावेलू - भारतीय चित्रपट अभिनेते आणि विनोदकार (जन्म: १५ जानेवारी १९१७)

# शून्य ते २४ तासांचा उपवास केल्यानं काय होतं? तज्ज्ञ सांगतात तासागणिक उपवासाचे फायदे

भारतात उपवास करण्याचे धार्मिक महत्त्व आहे. पण, याच धार्मिक महत्त्वाशिवाय उपवासाचे वैज्ञानिक फायदेदेखील आहेत. येत्या काही दिवसांत अनेक जण नवरात्रीचे उपवास करतील. परंतु, जे उपवास करीत नाहीत असे लोक उपवास करण्याच्या फायद्यांना कमी समजतात. जर तुम्ही उपवासाचे तासानुसार शरीरावर होणारे परिणाम विभाजित केले, तर ही विचारसरणी बदलू शकते. त्यासाठी आम्ही डॉ. मनेंद्र, सल्लागार व एचओडी, क्रिटिकल केअर विभाग, ग्लेनिगल्स हॉस्पिटल्स, लकडी का पुल, हैदराबाद यांच्याशी संपर्क साधला.

डॉ. मनेंद्र म्हणाले, "जेव्हा तुम्ही उपवास करता, तेव्हा कालांतराने अनेक शारीरिक बदल होतात. कारण- तुमचे शरीर अन्नाच्या अभावाशी जुळवून घेत असते."

उपवासामुळे काय होतं?

०-४ तास

जेवल्यानंतर लगेच आपले शरीर पचनावर लक्ष केंद्रित करते आणि पोषक द्रव्ये शोषून घेते. डॉ. मनेंद्र यांनी सांगितले, "रक्तातील साखर आणि इन्सुलिनची पातळी वाढते; ज्यामुळे ऊर्जा मिळते."

४-८ तास

पचन पूर्ण झाल्यानंतर रक्तातील साखर आणि इन्सुलिनची पातळी कमी होते. डॉ. मनेंद्र यांनी सांगितले, "शरीर ऊर्जेसाठी यकृत आणि स्नायूंमधील ग्लायकोजेन (संचयित ग्लुकोज) वापरते."

८-१२ तास

ग्लायकोजेनचा साठा कमी झाला की, शरीर ऊर्जेसाठी चरबी वापरते. डॉ. मनेंद्र यांच्या मते, "याला केटोसिस म्हणतात; जेथे फॅटी ॲसिडचे केटोन्समध्ये रूपांतर होते आणि त्याद्वारे मेंदू व स्नायूंना इंधन मिळते."

१२-१६ तास

शरीर चरबी कमी करण्यास सुरुवात करते आणि केटोन्सची पातळी वाढवते. डॉ. मनेंद्र यांनी सांगितले, केटोन्सची वाढलेली पातळी हार्मोन्सचे उत्पादन वाढवू शकते आणि त्यामुळे चांगली चरबी व स्नायू यांचे संरक्षण होण्यास मदत होते."

१६-२४ तास

जेव्हा पेशी खराब झालेले घटक तोडून आणि त्यांचा पुनर्वापर करून स्वतःची दुरुस्ती करू लागतात तेव्हा ऑटोफॅजी सुरू होते. डॉ. मनेंद्र यांनी स्पष्ट केले, "जळजळ कमी होते आणि शरीर सेल्युलर देखभालीवर लक्ष केंद्रित करते." तसेच गुरुग्राममधील मॅरेंगो एशिया हॉस्पिटल्सच्या प्रमुख, मुख्य पोषण तज्ज्ञ व आहारतज्ज्ञ परमित कौर यांनी सांगितले, "ऑटोफॅजी हा शरीराच्या खराब झालेल्या पेशी स्वच्छ करण्याचा मार्ग आहे; ज्यामुळे नवीन, निरोगी पेशी पुन्हा निर्माण होतात. तुमच्या दैनंदिन कॅलरीजचे सेवन १०-४० टक्क्यांनी कमी केल्याने ऑटोफॅजी होऊ शकते." कौर यांनी पुढे सांगितले, "दोन ते तीन दिवस दीर्घकाळ उपवास करताना पोषक घटकांचा अभाव यांसारख्या क्रियाकलापांमध्ये ऑटोफॅजी वाढू शकते; ज्यामुळे पेशींवर ताण येतो."

२४ तासांहून अधिक

२४ तासांहून अधिक उपवास केल्याने केटोसिस खोल होतो आणि ऑटोफॅजी वाढते. डॉ. मनेंद्र यांनी सांगितले, "यामुळे इन्सुलिन पातळीत लक्षणीय घट होण्यासह नुकसानकारी चरबी कमी होण्यास प्रोत्साहन मिळते आणि रक्तातील साखरेचे व्यवस्थापन करण्याची शरीराची क्षमता वाढवते." दरम्यान, डॉ. मनेंद्र म्हणाले की, २४ तासांपेक्षा जास्त काळ उपवास करायचा असल्यास आधी तुमचे शरीर निरोगी आहे की नाही याची तपासणी केली पाहिजे.

## राशि भविष्य

**मेष** – आरामात राहण्याचा आनंद आज लुटू शकाल. दिवसभर जरी तुम्ही धन कमावण्यासाठी प्रयत्न करत असाल परंतु, संध्याकाळी तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. वयोवृद्धाची तब्येत तुमच्या काळजीचे कारण ठरू शकते. दरदिवशी कोणाच्यातरी प्रेमात पडण्याचा आपला स्वभाव बदलण्याची गरज आहे.

**वृषभ** – अलिकडे घडलेल्या घटनांमुळे तुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारीरिक व अध्यात्मिक फायदा होईल. तुमच्या माता पक्षाने आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे.

**मिथुन** – आजच्या दिवशी तुम्ही चैतन्याने भारले असलात तरी तुमच्याबरोबर असायला हवी अशा व्यक्तीची कमतरता तुम्हाला नक्कीच जाणवेल. तुमचे धन तुमच्या कामी तेव्हाच येते जेव्हा तुम्ही व्यर्थ खर्च करण्यात स्वतःला थांबवतात ही गोष्ट आज तुम्हाला चांगल्या प्रकारे लक्षात येईल.

**कर्क** – भूतकाळात घडलेल्या गोष्टींवर विचार करीत बसू नका. आज तुम्हाला भावूकतेने ग्रासले असून त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न कराल. धन तुमच्यासाठी गरजेचे आहे परंतु, धनला घेऊन इतके गंभीर होऊ नका की, आपल्या नात्यालाच खराब कराल. कौटुंबिक जबाबदा-या या तुमच्या डोक्यावर येतील आणि तुमच्या मनावर दडपण येईल.

**सिंह** – भरपूर प्रवासामुळे तुम्ही उन्मादी बनाल. अतिखर्च, उधळेपणा आणि शंकास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंतणे टाळा. कौटुंबिक जबाबदा-या बंधनांकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. निष्काळजीपणा महागात पडू शकतो. रोमान्ससाठी अत्यंत उत्तेजनापूर्ण दिवस आहे.

**कन्या** – क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊन तुम्ही शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहाल. आज तुम्हाला पैश्याने जोडलेली काही समस्या येऊ शकते ज्याला सुरळीत करण्यासाठी तुम्ही आपल्या पिता किंवा पितातुल्य कुणी माणसाकडून सल्ला घेऊ शकतात. कुटुंबातील ताणतणावांमुळे तुमचे लक्ष विचलित होऊ देऊ नका.

**तूळ** – सामाजिक आयुष्यापेक्षा आरोग्याला प्राथमिकता द्यावी लागेल. अनपेक्षित बिलांमुळे आर्थिक बोजा वाढेल. जोडीदाराबरोबर योग्य तो ताळमेळ साधल्यास तुमच्या घरी सुख-समृद्धी व शांतता नांदेल. तुमच्या प्रिय व्यक्तीच्या बाहुपाशात तुम्हाला सुखकारक वाटेल. धाडसाने उचलेली पावले आणि घेतलेले निर्णय लाभदायक ठरतील.

**वृश्चिक** – आरोग्याची काळजी घ्या. आज आर्थिक पक्ष चांगले राहील परंतु, यासोबतच तुम्हाला ही काळजी घ्यावी लागेल की, तुम्ही आपल्या धनाला व्यर्थ खर्च करू नका. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ. आजच्या सायंकाळी काहीतरी खास योजना आखा. आजची सायंकाळ रोमॅण्टीक करण्याचा पुरेपुर प्रयत्ना करा.

**धनु** – नशिबावर हवाला ठेवून बसू नका, त्याऐवजी आपले आरोग्य सुधारण्याचा प्रयत्ना करा. भविष्यात असे होईल तसे होईल असे म्हणत राहू नका. आपले वजन नियंत्रणात आणून आपले आरोग्य सुस्थापित करण्यासाठी नव्याने व्यायाम सुरु करण्याची आत्यंतिक गरज आहे.

**मकर** – तुमच्या पत्नीसोबत कौटुंबिक अडचणींबाबत चर्चा करा. प्रेमळ दाम्पत्य म्हणून जगता यावे यासाठी पती-पत्नी दोघांनीही एकमेकांच्या संगतीत वेळ घालवून प्रेमळ नाते घट्ट करा. तुमची मुलेही घरातील शांतता, सौहार्द, आनंद याचा अनुभव घेऊ शकतील.

**कुंभ** – आज तुम्ही ऊर्जेने भरपूर असाल - तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. आज तुम्ही आपले धन धार्मिक कार्यात लावू शकतात ज्यामुळे तुम्हाला मानसिक शांतता मिळण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमच्याकडे खूपच कमी सहनशीलता आज असेल.

**मीन** – तुमच्या विनोदबुद्धीमुळे तुम्ही एखाद्या व्यक्तीला विनोदबुद्धी अंगी बाणवण्यासाठी उद्युक्त कराल. कारण तुम्ही त्या व्यक्तीला सांगाल की आनंद हा वस्तूंच्या मालकीमध्ये नसतो तर तो तुमच्या आतमध्ये दडलेला असतो. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे.

## भिवंडी बायपास रस्त्यावर ठाणे महापालिकेची धडक कारवाई



**ठाणे, (विवेक गुंजाळ) :** ठाणे महापालिकेतर्फे शुक्रवारी गोल्डन डाईज नाक्याकडून भिवंडीकडे जाणाऱ्या बायपास रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमणावर धडक कारवाई करण्यात आली. त्यात, लोखंडी पत्र्याचे ०६ गाळे, ०७ टपऱ्या, सहा दुकानांच्याबाहेरील पत्र्याच्या शेड काढण्यात आल्या. सात हातगाड्याही जप्त करण्यात आल्या. माजिवडा गोल्डन डाईज नाक्यावरून भिवंडीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील दुकानांच्या बाहेर सामान ठेवून रस्ता अडवून व्यवसाय करण्यात येत होता. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार करावाई करण्यात आली.

गॅरेज, प्लायवुडचे दुकान, भंगाराची दुकाने यांच्यावर कारवाई करतानाच, दुकानांबाहेर ठेवलेल्या वस्तूही जप्त करण्यात आल्या. दुकानांबाहेरील अवैध शेड तोडण्यात आले. त्यासोबत, हातगाडी, फेरीवाले यांच्यावरही निष्कासन कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईत, उपायुक्त (परिमंडळ ३) दिनेश तायडे, सहाय्यक आयुक्त अलका खैरे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासिम तडवी यांच्यासह परिमंडळ तीन मधील कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते.

# रस्त्यावर न दिसल्यास होणार कारवाई, आयुक्तांचा इशारा



**पुणे (अभिजित येरल्लू ) :** शहरातील पावसाळी गटारांची स्वच्छता संबंधित ठेकेदारांकडून करून घ्यावी, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी प्रशासनाला केल्या आहेत. रस्त्यावर पाणी साचल्यास मलनिस्सारण विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी रस्त्यावर उतरून काम करावे, अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.

शहरात दोन दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साचले होते. जागोजागी पावसाचे पाणी साठल्याने त्यातून वाहने चालविताना वाहनचालकांची तारांबळ उडाली. परिणामी वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. पावसाळी गटारांमधील कचरा स्वच्छ न केल्याने रस्त्यावरील पाणी वाहून न जाता तसेच राहिल्याच्या तक्रारी थेट महापालिका आयुक्तांकडे करण्यात आल्या. या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्तांनी संबंधित ठेकेदारांकडून पुन्हा पावसाळी गटारांची स्वच्छता करून घ्यावी. मोठा पाऊस झाल्यानंतर मलनिस्सारण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरून काम करावे, नाहीतर कारवाई होईल, असा इशाराच दिला.

दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेच्या वतीने पावसाळी गटारे, मलवाहिन्यांची स्वच्छता केली जाते. यावर्षी देखील पालिकेने ठेकेदारांमार्फत ही स्वच्छता केली होती. मात्र, त्यानंतर देखील सुरुवातीच्या काळात शहरात पडलेल्या पावसामध्ये अनेक रस्ते जलमय झाल्याचेच चित्र होते. डोंगरावरून रस्त्यावर वाहून येणारे पाणी थांबविण्यासाठी चर देखील खोदण्यात आले होते. मात्र, आता पावसाळ्याच्या अखेरच्या टप्प्यात देखील पडत असलेल्या पावसानंतरही रस्त्यांवर सतत पाणी साचत असल्याचे समोर आले आहे.

याबाबत महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांना विचारले असता, ते म्हणाले बुधवारी शहरात कमी वेळेत मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. शहरातील पावसाळी गटारांच्या वाहिन्यांची क्षमता कमी असल्याने त्यामधून लगेचच पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. अनेक ठिकाणी पाणी साचून राहिले. यावेळेत पालिकेचे अधिकारी, कर्मचारी कुठे दिसले नाहीत, याबाबत देखील तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत.


## पावसामुळे रस्ते वाहतूक कोलमडली



**मुंबई (यश सावंत) :** मुंबईत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे वाहतुकीवर परिणाम झाला असून मुंबईमधील मुख्य रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. मुसळधार पावसामुळे अंधेरी सब-वे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला असून पूर्व मुक्त मार्गावरील वाहतूक संथगतीने सुरू होती. याशिवाय ठिकठिकाणे वाहने व बस बंद पडल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला होता.

मुंबईत जोरदार पावसामुळे शुक्रवारीही जनजीवन विस्कळीत झाले आहे. रस्ते वाहतुकीवरही त्याचा परिणाम झाला असून पावसामुळे पूर्व मुक्त मार्गावर दक्षिण वाहिनीवरील वाहतूक संथ गतीने सुरू आहे. याशिवाय पूर्व मुक्त मार्गावर पोल क्रमांक २६० ते २८० दरम्यान पाणी साचले होते. वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथे बस बंद पडल्यामुळे दक्षिणेकडे जाणारी वाहतूक धीम्या गतीने सुरू आहे. अंधेरी सब-वे येथे पाणी साचल्यामुळे तेथील वाहतूक बंद करण्यात आली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून तेथील वाहतूक गोखले पुलावरून वळवण्यात आली. तसेच डी. एन. नगर येथेही पाणी साचल्यामुळे वाहनचालक एस.व्ही. रोड ते गोखले पुल, तसेच उत्तरेकडील वाहतूक ठाकरे पुलावरून होत आहे. पार्ले जंक्शन येथे मोटरगाडीला आग लागल्यामुळे तेथील दक्षिण वाहिनीवरील वाहतुकीवर परिणाम झाला आहे.

# नाशिकमधून मराठवाड्याकडे ४८ टीएमसी पाणी, गंगापूरसह १२ धरणांमधून विसर्ग



**नाशिक (सचिन कदम ) :** पावसाने नव्याने जोर धरल्याने नाशिक शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूरमधून पुन्हा एकदा विसर्ग करण्यात आला आहे. जिल्ह्यातील एकूण १२ धरणांमधून पाणी सोडण्यात आले आहे. सर्वच धरणे तुडुंब असल्याने विसर्गाशिवाय कोणताही पर्याय नसल्याचे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. नांदूरमध्यमेश्वरमधून मराठवाड्यातील जायकवाडीकडे आतापर्यंत ४७ हजार ६२२ दशलक्ष घनफूट म्हणजे जवळपास ४८ टीएमसी इतक्या पाण्याचा विक्रमी विसर्ग झाला आहे. चार, पाच दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने मुक्काम ठोकला आहे. कधी विजांच्या कडकडाटात तर कधी संथपणे संततधार होत आहे. गुरुवारपासून त्याचा जोर वाढला. शहरातील रस्ते व चौकात अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत होत आहे. तात्पुरत्या स्वरुपात बुजविलेले खड्डे पुन्हा उघडे पडल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. जिल्ह्यातील सर्वच धरणे तुडुंब भरली आहेत. लहान-मोठ्या २४ धरणांमध्ये सध्या ६४ हजार ३४० दशलक्ष घनफूट म्हणजे ९८ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे पावसाचे येणारे पाणी साठविण्यास धरणात जागा शिल्लक नसल्याचे विसर्ग करावा लागत आहे. शुक्रवारी सकाळी गंगापूर धरणातून ११६९ क्युसेकचा विसर्ग करण्यात आला. याशिवाय दारणा २००४, कडवा १६६०, भाम ११२०, वालदेवी ३०, आळंदी ३०, भावली १३५, वाघाड २२९, वाकी ११६, नांदूरमध्यमेश्वर बंधारा १५२४८, कश्यपी ३२०, करंजवण ६०२ क्युसेकचा विसर्ग करण्यात आल्याचे पाटबंधारे विभागाने म्हटले आहे.

### तीन समुहातील पाणी मराठवाड्याकडे

गंगापूर, दारणा आणि पालखेड समुहातील धरणांचे पाणी नांदूरमध्यमेश्वरमार्गे गोदावरी नदीतून मराठवाड्यातील जायकवाडी धरणाकडे जाते. यंदा वरच्या भागात चांगला पाऊस झाल्यामुळे धरणे आधीच पूर्ण क्षमतेने भरली. खालील भागात मोठ्या प्रमाणात पाणी सोडले गेले. एकट्या नाशिक जिल्ह्यातून मराठवाड्याकडे ४७ हजार ६२२ दशलक्ष घनफूट म्हणजे जवळपास ४८ टीएमसी पाणी सोडल्याची आकडेवारी आहे. या पाण्यातच जायकवाडी धरण जवळपास निम्मे भरल्याचे पाटबंधारे विभागाचे निवृत्त कार्यकारी अभियंता उत्तम निर्मळ यांनी सांगितले.

# राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करुन केले वृक्षारोपण!



**वासिंद ( रोहित जैसवार )-** येथील समाजहितकारिणी संस्था संचलित उत्कर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करुन या निमित्ताने महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) स्थापनेच्या निमित्ताने उत्कर्ष महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. यामध्ये श्रम आणि संस्कार यांचे महत्त्व समाजाला पटवून देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वपूर्ण काम करीत आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन प्राचार्य प्रा. डॉ. शेषराव मसूडकर यांनी केले.

यावेळी उपप्राचार्य अजित पोटे, प्राध्यापिका दिपिका बिडवी, प्रा. भारती सोपणार यांनी राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमावेळी प्राध्यापक संदीप पवार, प्रा. दीपाली बोद्रे, प्रा. वृषाली तरणे, प्रा. उषा शेलार, प्रा. प्राजक्ता खरे, प्रा. दर्शना निचिते, प्रा. स्वप्नाली साळवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी प्राध्यापक नितीन वेखंडे, सुत्रसंचालन दीपिका बिडवी यांनी तर प्रा. नितीन वेखंडे यांनी आभारप्रदर्शन मानले.


# Delhi High Court orders 'social media influencer' to take down controversial videos against Complan




Delhi - In a suit alleging trademark and copyright infringement and disparagement of health drink Complan produced by Zydus Wellness, the Delhi High Court on Thursday directed "a "social media influencer" to take down the videos where he had claimed that two scoops of the powder contains 40-50 grams of sugar. The court held that the influencer, Prashant Desai, cannot be permitted to "identify and/ or notify the plaintiff's (Zydus Wellness) product 'Complan' by directly naming it".

"The verdict is among the first from Delhi HC where a social media influencer is being directed to pull down his content over alleged disparagement, and trademark and copyright infringement," said advocate Misha Rohatgi, representing the influencer. Justice Saurabh Banerjee observed, "Merely being a 'social media influencer', the defendant is not bestowed with the independence to speak and/ or comment about a subject of which he is not the master. In fact, 'Social Media Influencer' like the defendant is always expected not to cross over and try to play the role of a professional or try to fall in/step into the shoes of a teacher or any other professional or act like a preacher, more so without any backing to substantiate what is being talked/ shared".

# Langurs hired to drive away hungry monkeys at Green Park Stadium



Langurs and their handlers have been hired by the Uttar Pradesh Cricket Association (UPCA) to end the food-grabbing menace of monkeys at the Green Park Stadium in Kanpur, the venue of the second Test match between India and Bangladesh.

According to venue director Sanjay Kapoor, broadcast camera persons in the stands are at the highest risk of monkeys stealing with their snacks and drinks. "To avoid the terror of monkeys, we have langurs (long-tailed leaf monkeys) to take care of them," Kapoor said.

The services of Langurs have been hired in the past too at international cricket matches at Kanpur. The raised stand just beyond the boundary line used by television crew to place the camera at the stadium and record the match was covered with black cloth at the back and on either side to reduce the chances of monkeys getting access to eatables. On the eve of the Test match, Kapoor told the media: "PWD and Harcourt Butler Technical University also conducted their inspection on three days before the match and found that some seats in C block cannot be used for spectators as it is not safe. About 1750 seats of the upper block are still available for spectators," Kapoor had said.

# कला शिक्षक शंभूराव सोनवणे यांचा गुरुद्रोणाचार्य पुरस्काराने सन्मान !



**वासिंद (सूचित शिंदे)-** येथील शेई विभाग हायस्कूल या शाळेचे कलाशिक्षक शंभूराव सोनवणे यांना नवी मुंबई येथील कला साधना सामाजिक संस्था यांच्या वतीने गुरु द्रोणाचार्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सोनावणे हे गेल्या 27 वर्षापासून विद्यालयात विद्यार्थ्यांना चित्रकलेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचा आयोजन करून मार्गदर्शन करीत आहेत त्यांनी आजपर्यंत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे सातत्याने लक्ष दिले आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हितासाठी केलेल्या कामांची दखल घेत नुकताच त्यांना कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, सहा. पोलिस आयुक्त रेहाना शेख, सिने कलावंत जयवंत ओक, प्रख्यात कवि नितीन चंदनशिवे या मान्यवरांच्या हस्ते त्यांना गुरु द्रोणाचार्य हा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. याआधीही त्यांना वेगवेगळ्या संस्थांनी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

# Woman creates ruckus outside Devendra Fadnavis office, removes nameplate, breaks potted plants



**Mumbai -** An unknown woman on Thursday trespassed into the sixth floor of Maharashtra's secretariat, and attempted to vandalise the office of Deputy Chief Minister Devendra Fadnavis, the Mumbai police said. According to the police, the woman created a ruckus, removed the name plate of Fadnavis in his office, broke the potted plants near the cabin around 7 pm and escaped from the building. The incident, the video of which went viral on social media, has raised security concerns in the Secretariat with the police still struggling to identify and trace the woman. The CCTV footage shows the woman expressing outrage outside the high security cabin of Fadnavis in the state government's headquarters in Mumbai. She is seen hurling objects in protest against the deputy CM, said the Marine Drive police on Friday. Meanwhile, Fadnavis said the police are trying to identify the woman and address her concerns. "We will try to understand why the woman was upset. The government headquarters Mantralaya doors are always open for common persons. They walk in and out daily with their problems seeking solutions," he told reporters in Shirdi. On a query on security lapse, Fadnavis said, "Well, we have never restricted people coming to Mantralaya. How can we stop the common man from coming to the government office? Only when there are alerts do we take additional precautions to ensure flawless security". A senior police officer said the Mantralaya is comparatively empty at 7 pm but the staffers at the deputy chief minister office were present when she came.

## थोडक्यात

### महाड तालुका मराठा समाज सेवा संघाच्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव

● कल्याण, (गणेश बागडे) :

महाड तालुका मराठा समाज सेवा संघ, कल्याण तर्फे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात समाजातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ रविवार, २९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. पूर्वेकडील मराठा कोळसेवाडी येथे संध्याकाळी पाच वाजता होणाऱ्या या समारंभाला अध्यक्ष म्हणून दत्तात्रय साळुंखे उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांतर्फे देण्यात आली.

### 'मुख्यमंत्री योजनादूत'; अर्ज करण्यास ३० सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

● मुंबई, (विशाल कारंडे) :

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता मुदतवाढ देण्यात आली असून आता इच्छुक उमेदवारांना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

### चिंचवडच्या आरोपीने पोलिसांच्या अंगावर घातली गाडी;



● पिंपरी- चिंचवड, (शकिल शेख) :

आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या अंगावर गाडी घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना समोर आली आहे. हा सर्व थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे. याप्रकरणी जयपूर येथील स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिंपरी- चिंचवड सायबरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण स्वामी हे जखमी झाले आहेत. त्यांच्या पायाला मुका मार लागला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिंचवड मध्ये पोलीस अटक करतील अशी भीती दाखवून एक कोटी आठ लाख रुपयांची फसवणूक केलेला आरोपी अक्षत गोयलला पकडण्यासाठी सायबर टीम राजस्थान मधील जयपूर येथे रवाना झाली होती. मयांक गोयल हा अटक असून त्याच्या मदतीने अक्षत गोयलचा शोध सायबर पोलीस घेत आहेत. तो राजस्थानमधील जयपूर येथे असल्याची माहिती मयांककडून पोलिसांना मिळाली. सापळा रचून आरोपी अक्षत गोयलला पकडण्यासाठी सायबर पोलीस त्या ठिकाणी पोहोचले. अक्षत हा त्याच्या इतर मित्रांसह काळ्या चारचाकी गाडीत बसला होता. पोलिसांनी त्या गाडीला घेरून अक्षत आणि त्याच्या मित्रांना खाली उतरण्यास सांगितले. परंतु, थेट गाडी सुरू करून अक्षतने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्याला अडवण्यासाठी गाडीपुढे थांबलेल्या सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण स्वामी यांच्या अंगावर गाडी घालून अक्षत पळून गेला. घटनेनंतर स्थानिक पोलीस ठाण्यात स्वामी यांनी सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी आणि जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी अक्षतवर गुन्हा दाखल केला आहे.

# मुंबई विद्यापीठ अधिसभा निवडणूक : 516 मते अवैध; खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना 1,114 मतांचा कोटा




● मुंबई, (यश सावंत) :

मुंबई विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधर गटाच्या अधिसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असून यंदा १३ हजार ४०६ मतदारांपैकी जवळपास ५५ टक्के मतदारांनी मतदान केले. त्यानुसार ७ हजार २०० मतांपैकी ६ हजार ६८४ मते वैध आणि ५१६ मते अवैध ठरली आहेत. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना विजयासाठी जवळपास १ हजार ११४ मतांचा कोटा पार करणे आवश्यक आहे.

नोंदणीकृत पदवीधर गटाच्या अधिसभा निवडणुकीत युवा सेना (ठाकरे गट) आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुरस्कृत विद्यापीठ विकास मंचने सर्वच्या सर्व जागांवर उभे केले आहेत. त्यामुळे मुख्य लढत ही युवा सेना आणि 'अभाविप' यांच्यात होत आहे. तसेच नोंदणीकृत पदवीधर गटाच्या खुल्या प्रवर्गातील ५ जागांसाठी १५, तर प्रत्येकी १ जागा असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातून २, अनुसूचित जमाती प्रवर्गातून ३, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती प्रवर्गातून ३, इतर मागास वर्ग प्रवर्गासाठी ३, महिला प्रवर्गातून २ असे एकूण २८ उमेदवार १० जागांसाठी निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या पार्श्वभूमीवर राखीव प्रवर्गातून पाचही जागांवर ठाकरे गटाच्या युवा सेनेचे उमेदवार आघाडीवर असून त्यांचा विजय जवळपास निश्चित आहे. सेनेने राखीव प्रवर्गातील सर्व जागांवर निर्णायक आघाडी घेतली आहे. या उमेदवारांना सुमारे पाच हजार मते मिळाली आहेत. तर 'अभाविप'च्या उमेदवारांना ८०० ते १ हजार मते मिळाली आहेत. त्यामुळे हे उमेदवार निश्चितच विजयी होतील, फक्त अधिकृत घोषणा बाकी आहे. शिंदे – भाजप सरकार सुरुवातीपासूनच रडीचा डाव खेळत होते. परंतु तरीही आम्ही सर्व जागांवर विजय संपादन करू,' असा विश्वास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व युवा सेनेचे सचिव वरुण सरदेसाई यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

## कल्याणीनगर अपघात प्रकरणातील मुलाला दिल्लीतील शिक्षण संस्थेने प्रवेश नाकारला

● पुणे, (अभिजित येरल्लू) :



पुणे : कल्याणीनगर अपघात प्रकरणात गुन्हा दाखल झालेला बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल याच्या मुलाला दिल्लीतील एका शैक्षणिक संस्थेने प्रवेश नाकारल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली. मुलाच्या वकिलांनी याबाबतची माहिती न्यायालयात दिली. पुणे पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवालच्या मुलाविरुद्ध अंतिम तपास अहवाल बाल न्याय मंडळात (जेजेबी) गुरुवारी सादर केला. रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न, तसेच कटात अल्पवयीन मुलगा सामील असल्याचे पोलिसांनी सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

बाल न्याय मंडळात विशेष सरकारी वकील शिशिर हिरे आणि सहायक वकील सारथी पानसरे यांच्यामार्फत मुलाविरुद्ध २०० पानी तपास अहवाल (सप्लिमेंटरी फायनल रिपोर्ट) सादर केला. रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न, तसेच कटात अल्पवयीन मुलगा सामील असल्याचे पोलिसांनी सादर केलेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार पोलिसांनी मुलाविरुद्ध पुरावा नष्ट करणे (भादंवि २०१), (बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक (भादंवि ४६७), कट रचल्याप्रकरणी (१२० ब) कलमवाढ केली आहे.

अगरवाल याच्या मुलाला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाच्या आदेशाने त्याचा ताबा नातेवाइकांकडे सोपविण्यात आला आहे. मुलगा बारावी उत्तीर्ण आहे. मुलाला दिल्लीतील एका शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळाला होता. मात्र, कल्याणीनगर अपघात प्रकरणात मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची माहिती मिळताच संस्थेने त्याला प्रवेश नाकारला, अशी तक्रार मुलाच्या वकिलांनी बाल न्याय मंडळात केली. विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनीही त्याला हरकत घेतली नाही. मुलाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होता कामा नये, असेही त्यांनी सांगितले. मात्र, बाल न्याय मंडळाने याबाबत कोणताही आदेश दिला नाही वा कसलीही सूचना संबंधित शैक्षणिक संस्थेला केली नाही.

कल्याणीनगर भागात १९ मे रोजी झालेल्या अपघातात संगणक अभियंता तरुण-तरुणीचा मृत्यू झाला होता. बांधकाम व्यावसायिक अगरवालच्या मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. पोलिसांनी परदेशी बनावटीची महागडी मोटार (पोर्श) जप्त केली होती.

## ८.७२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड

● मुबंई, ( विशाल कारंडे) :


महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.७२ टक्के महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची परतफेड दि. २८ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. २९ ऑक्टोबर, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळविले आहे. "परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१" अन्वये महाराष्ट्र शासनाने वरील दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. २९ ऑक्टोबर, २०२४ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही. सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४(२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

## पालघरमध्ये रिलायन्सचा वस्त्रोद्योग प्रकल्प

### जमिनीच्या हस्तांतरासाठी एमआयडीसीचा अर्ज, दर मात्र गुलदस्त्यात

● पालघर, (सुचिता देशमुख) :

नियोजित वाढवण बंदराजवळ माहीम व टोकराळे येथील महसूल विभागाच्या ताब्यातील ८८० एकर जमिनीचे 'पास थ्रू' पद्धतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भूसंपादन केले होते. ही जमीन हस्तांतराच्या तरतुदीनुसार 'रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड'ला वस्त्रोद्योग प्रकल्प उभारण्यासाठी द्यावी, असा अर्ज एमआयडीसीने पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे केला आहे. मात्र या हस्तांतरादरम्यान राज्य शासनाला व नंतर एमआयडीसीला किती मोबदला मिळणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे.



रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (आरआयएल) कंपनीच्या प्रस्तावित वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी उपमुख्यमंत्री कार्यालयातील प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली ६ सप्टेंबर व ११ सप्टेंबर रोजी बैठक झाली. या वेळी भूसंपादनासाठी जमिनीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्याचे निर्देशित करण्यात आले होते. रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडतर्फे १६ सप्टेंबर व २१ सप्टेंबर रोजीच्या पत्राद्वारे पालघर तालुक्यातील माहीम गावातील २२६.५५.४० हेक्टर-आर व टोकराळे येथील १२५.५५ हेक्टर-आर अशी सुमारे ८८० एकर क्षेत्रफळ जागा 'पास थ्रू' पद्धतीने वाटप करण्याबाबत एमआयडीसीला विनंती केली होती. या भूसंपादनाबाबत क्षेत्र निश्चितीसाठी वन विभागाच्या अहवालासह सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आला आहे.

## नाशिक जिल्हा बँकेच्या सभेत गोंधळ, बड्या थकबाकीदारांना मिळणारे अभय चर्चेत

● नाशिक, (सचिन कदम ) :



जिल्हा मध्यवर्ती बँकेची बड्या थकबाकीदारांकडील ३२१ कोटी आणि संचालकांकडील १८२ कोटींच्या वसुलीत १०१ ची कारवाई, सहा महिन्यांत वसुली प्रगतीपथावर न गेल्यास जिल्हा बँक महाराष्ट्र राज्य बँकेत विलीन करणे, थकीत कर्ज वसुली व ठेवीदारांना पैसे परत देण्यासाठी समिती, सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, असे विविध ठराव नाशिक जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत शेतकरी व ठेवीदार सभासदांकडून मांडण्यात आले. यातील काही ठराव प्रशासकांनी मान्य केले. सभासदांनी विविध मुद्यांवरून बँक प्रशासनाला जाब विचारत धारेवर धरले. यामुळे प्रचंड गोंधळात सभा पार पडली.

नाशिक जिल्हा बँकेची सर्वसाधारण सभा गुरुवारी दुपारी दादासाहेब गायकवाड सभागृहात पार पडली. सभेत वेगवेगळ्या विषयांवरून गदारोळ उडाला. प्रशासक प्रतापसिंह चव्हाण यांनी थकबाकी वसुलीसाठी चाललेले प्रयत्न, बँकेची आर्थिक स्थिती, ठेवी वाटप आदींची माहिती मांडली. ही बँकेची शेवटची सर्वसाधारण सभा ठरू नये. रिझर्व्ह बँकेचे पत्र वाचून दाखविण्याची तयारी चव्हाण यांनी करताच सभासदांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. बँकेचे वसुली पथक थकबाकीदार लहान शेतकऱ्यांच्या दारात जात असताना बडे थकबाकीदार, साखर कारखाने, आमदार, दूध संघ आणि कंपन्यांच्या थकबाकी वसुलीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करण्यात आला. बड्या थकबाकीदारांकडील वसुलीसाठी समिती स्थापन करण्याचा ठराव मांडला गेला.

माजी संचालकांकडील वसुलीबाबत चार जूनला स्थगिती उठली. परंतु, सहकारमंत्री आमदार, खासदारांना का पाठिशी घालत आहेत, असा प्रश्न मनपाचे माजी स्थायी सभापती उद्धव निमसे यांनी केला.


## घुग्घुसवासियांचा श्वास प्रदूषणामुळे गुदमरणार

● चंद्रपूर, (नितीन देवळेकर) :

वायू प्रदूषणामुळे घुग्घुसवासियांचा श्वास गुदमरत असतांना व राज्यात प्रदूषणाची सर्वाधिक धोक्याची पातळी घुग्घुसने गाठलेली असतांना लॉयड मेट्ल्स उद्योग समुहाचा ४० लाख टन प्रतिवर्ष क्षमतेचा विस्तारित प्रकल्प येथे प्रस्तावित आहे. या प्रकल्पाला मान्यता मिळाल्यास घुग्घुस आणि परिसरातील नागरिकांना प्रदूषणामुळे गाव सोडण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. त्यामुळे पर्यावरणवाद्यांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध सुरू केला आहे.

घुग्घुस येथील लायड्स मेटल्स प्रकल्पात दिवसाला पाचशे मेट्रीक टन प्रति स्पॉंज आयरनचे उत्पादन घेतले जाते. २००६ ला या प्रकल्पाची क्षमता वाढली आणि उत्पादन २ लाख ७० हजार मे. टनापर्यंत पोहचले. आधीच या प्रकल्पामुळे प्रदूषणाची समस्या तीव्र आहे. या परिसरात २०२४ या वर्षात प्रदूषण निर्देशांक ६३.६३ एवढा नोंदविला गेला. तो धोक्याच्या पातळीजवळ पोहचला आहे. २०१३ मध्ये घुग्घुस प्रदूषणचा (वायू, जल आणि जमीनीचे प्रदूषण)निर्देशांक ८१.९० इतका होता.

यावरून येथील प्रदूषणाची तीव्रता लक्षात येते. विशेष म्हणजे स्पॉंज आयरनच्या प्रकल्पांना प्रदूषणामुळे जगभरात विरोध होते आहे. अनेक प्रकल्प बंद पाडले. मात्र आता घुग्घुस येथे या प्रकल्पाचा विस्तार करण्याचा घाट घातला जात आहे. घुगुस च्या चारही बाजूला असलेली गावे आधीच प्रदूषित आहेत. त्यातही उसेगाव हे गाव प्रदूषणाचे केंद्रबिंदू आहे. या गावातील कापसाची शेती उद्धवस्त झाली आहे. लायड्स मेटल्ससाठी कच्चा लोखंड जिल्ह्याबाहेरून आणला जातो. चंद्रपूर- गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड, आष्टी, अहेरी, सिरोंचा या भागातील वाहतुकीचे रस्ते अवजड वाहनांनी पूर्णतः खराब केले आहे. चंद्रपूर जिल्ह्याती रस्ते खराब झाले आहे.



### श्वसनाचे आजार वाढले

घुग्गुसचे प्रदूषण आधीच कोळसा खाणींमुळे वाढलेले आहे. या परिसरात थर्मल, मायनिंग आणि स्पॉंज आयरन प्रकल्प आहे. त्यामुळे येथील प्रदूषण आता निर्सग सुद्धा सहन करू शकत नाही. आरोग्याच्या समस्या वाढल्या आहरे. घरोघरी श्वसनाचे आजार जडले आहे. जगभरातील स्पॉंज आयरन प्लांट्स ला कोळसा आधारित आणि गॅस आधारित अशा दोन प्रकारात विभागले जाते. नैसर्गिक वायूवर आधारित प्लांट्स हे प्रदूषणाच्या संदर्भात इको फ्रेंडली समजले जातात, पण घुग्गुस येथील प्रकल्प हा कोळशावर आधारित आहे, त्यामुळे प्रदूषणाची तीव्रता आणखीनच वाढणार आहे.

## उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी' कार्यक्रमाचे नवी मुंबईला आयोजन

● नवी मुंबई, (धनश्री सट्टा) :

गत दोन वर्षात महाराष्ट्राने औद्योगिक क्षेत्रात साध्य केलेल्या प्रगतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आज भारतात पहिल्या स्थानावर आहे. अनेक महत्त्वाचे निर्णय शासनाने या दोन वर्षात घेतले. महाराष्ट्राने घेतलेल्या अनेक महत्त्वाच्या निर्णयाची माहिती उद्योग जगत साकारणाऱ्या उद्योजकांना, व्यवसायिकांना व्हावी, राज्याचे व्हिजन कळावे या उद्देशाने शनिवार, दि.28 सप्टेंबर रोजी दु. 2.00 वा. स्व. दि.बा.पाटील भूमिपुत्र भवन,से.19 बी,उलवे नोड, बामण डोंगरी,नवी मुंबई येथे 'उद्यमात सकल समृद्धी, महाराष्ट्राची उद्योग भरारी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या विशेष समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, परिवहन अध्यक्ष भरत गोगावले, सिडको अध्यक्ष संजय शिरसाट, खासदार,आमदार प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. याचबरोबर उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त प्रदीप चंद्रन, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विजय राठोड उपस्थित राहणार आहेत.